पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक १५ • मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते. सर्जनशीलतेने तुमच्यात प्रगल्भ विचार येतात. विचाराने ज्ञान वाढते, आणि ज्ञानाने माणूस महान बनतो.

सिटी न्यूज सुपरफास्ट
पातुर शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
प्रदीप काळपांडे
तालुका प्रतिनिधी
+91 9423259577

## »थोडक्यात

### राज्यात पाऊस; विदर्भात रिमझिम!

मुंबई: महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पाऊस झाल्यानंतर काही काळ खंड पडला होता. आता राज्यात पावसाची नवी सर आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २१ जुलै रोजी महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. प्रादेशिक हवामान विभागाच्या अंदाजानुसार मुंबई, ठाणे, रायगड आणि पुण्याती घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. राज्यात सर्वत्र पावसाचा जोर वाढला असला तरी विदर्भात मोसमी पावसाची सर गायब आहे. अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये हलक्या सरींची शक्यता आहे.

### राज्यात 'जलयुक्त शिवार-3' लवकरच!



**नागपूर :** ग्रामीण भागातील पाणी पातळीत वाढ करण्यासाठी जलयुक्त शिवार योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केली. याचा फायदा होत असल्याचा दावा सरकारकडून करण्यात येते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महत्त्वाकांक्षी योजनेचा टप्पा तीन लवकरच सुरू करण्यात येणार आहे. या कामासाठी तीन वर्षांचा आराखडा तयार होत आहे. गावांमध्ये धरणाची कामे करण्यात येणार आहेत. संबंधित भागातील आमदारांना याचे सादरीकरण करण्याच्या सूचना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. १५ ऑगस्टला या योजनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) बैठक झाली. या बैठकीत या प्रकल्पाची माहिती देण्यात आली. राज्य शासनाकडून कृषी विभागासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांवर या बैठकीत मंथन झाले. जलयुक्त शिवार योजनेचा आराखडा कृषी, जलसंधारण विभागाच्यावतीने तयार केला जात आहे.

# युवकांच्या भविष्याशी खेळ खपवून घेणार नाही...!

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा इशारा

प्रतिनिधी २१ जुलै

नवीदिल्ली : कॉकरोच जनता पार्टीच्या संसद मार्चनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे नीट पेपर लीकवर पहिल्यांदाच वक्तव्य समोर आले आहे. पीएम मोदींनी एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत सांगितले की, युवकांच्या भविष्याशी खेळ करू देणार नाही. पेपर लीकच्या दोषींना कठोरात कठोर शिक्षा दिली जाईल. पीएम मोदी म्हणाले, पेपर लीक हा राजकारणाचा विषय नाही. त्यांच्या भविष्याचे नुकसान होऊ नये, म्हणूनच री-एग्झाम घेण्यात आली आणि ती यशस्वीपणे पूर्ण केली. ते म्हणाले की पेपर लीक प्रकरणात सरकारकडून तत्काळ कारवाई करण्यात आली. विद्यार्थ्यांबाबत सरकार संवेदनशील आहे.

कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने सौरव दास आणि आशुतोष राकां यांनी आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची भेट घेतली. सूत्रांच्या माहितीनुसार, दोघांमध्ये दोन फेऱ्यांची चर्चा झाली, परंतु सरकारकडून आंदोलनकर्त्यांच्या कोणत्याही मागणीवर कोणतेही आश्वासन देण्यात आले नाही. नड्डा यांनी त्यांना धरणे आंदोलन संपवून सामान्य स्थिती पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. चर्चेदरम्यान जे. पी. नड्डा यांनी विचारले की त्यांच्या मागण्या काय आहेत. यावर प्रतिनिधींनी आपल्या मागण्यांची यादी सांगितली. नड्डा यांनी त्यांना सांगितले की जर त्यांना त्यांच्या मागण्यांवर सरकारकडून विचार व्हावा असे वाटत असेल तर त्यांनी लिखित स्वरूपात सादर करावे.

### नीट परीक्षेबाबत नेमकं काय काय म्हणाले मोदी ?

नीट परीक्षेबाबत बोलताना पंतप्रधानांनी सांगितले की, जेव्हा पेपर लीकची बातमी समोर आली, तेव्हा सरकारने तत्काळ कारवाई करत १३ जणांना अटक करून त्यांची तुरुंगात रवानगी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याचे कोणतेही नुकसान होऊ नये यासाठी नीट पुनर्परीक्षेला प्राधान्य देण्यात आले आणि ही पुनर्परीक्षा यशस्वीपणे पार पाडून तिचा निकाल जाहीर करण्यात कोणताही विलंब केला गेला नाही.

भविष्यात पुन्हा असा प्रकार घडू नये यासाठी अत्यंत कडक पावले उचलण्यात आली आहेत. पेपर लीकच्या धंद्यात जे लोक लिप्त आहेत आणि दोषी आढळल्यामुळे ज्यांना अटक करण्यात आली आहे, त्यांना कठोरात कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी सर्वोच्च दर्जाच्या



वकिलांनीही सहकार्य करावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले आहे; जेणेकरून पेपर लीकसारखे पापकृत्य करणाऱ्यांना कडक शासन मिळेल.

पुढे असा पेपर लीक रोखण्यासाठी उचललेल्या ठोस पावलांची माहिती देताना पंतप्रधानांनी स्पष्ट केले की, हा केवळ एका राज्याचा किंवा फक्त केंद्र सरकारचा विषय नाही, तर संपूर्ण देशाचा विषय आहे. देशातील ज्या ज्या राज्यात पेपर लीक प्रकरणात लोक लिप्त आहेत, ज्यांनी हे घाणेरडे पापकृत्य केले आहे, त्यांना शिक्षा देण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. हा कोणत्याही पक्षीय राजकारणाचा विषय नसून देशाचा आणि तरुणांच्या भविष्याचा विषय आहे. त्यामुळे युवकांच्या भविष्याशी कोणीही खेळ करू नये यासाठी कडक पावले उचलून दोषींना शिक्षा दिली पाहिजे आणि एक दोषरहित परीक्षा यंत्रणा तयार करण्यासाठी सर्वांनी मिळून एकत्र काम केले पाहिजे, असे पंतप्रधानांनी सांगितले असल्याची माहिती आज (मंगळवारी) पार पडलेल्या एनडीए संसदीय पक्षाच्या 'मंगल मिलन' बैठकीनंतर केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली.

### वांगचुक यांना मेदान्ता रुग्णालयात हलवण्यास दिल्ली उच्च न्यायालयाची मंजुरी

» दिल्ली उच्च न्यायालयाने सोनम वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयातून त्यांच्या पसंतीच्या मेदांता रुग्णालयात हलवण्याची परवानगी दिली आहे. वांगचुक यांना त्वरित मेदांता रुग्णालयात हलवले जाईल आणि सफदरजंग रुग्णालय त्यांचे सर्व वैद्यकीय अहवाल मेदांता रुग्णालयाकडे सोपवेल. न्यायालयाच्या निर्देशानुसार, मेदांता रुग्णालयाचे संचालक सोनम वांगचुक यांच्या पुढील उपचारांवर देखरेख ठेवण्यासाठी डॉक्टरांचे एक पॅनेल गठित करतील. १८ जुलै रोजी जंतरमंतरवरून ताब्यात घेतल्यानंतर दिल्ली पोलिसांनी वांगचुक यांना सफदरजंग रुग्णालयात नेले होते.

## चॉकलेटचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अकोला :** चॉकलेटचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची घटना १५ जुलै रोजी घडली होती. याप्रकरणातील आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली. सविस्तर असे की, पोलिस पोलिस स्टेशन माना येथे १५ जुलै रोजी एका अल्पवयीन मुलीवर लैंगीक अत्याराबाबत अप. नं. २८२/२०२६ क्रं. ६९, ७४ भा. न्या. सं. सहकलम ८ पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीने अल्पवयीन मुलीस चॉकलेट देण्याचे आमीष दाखवुन घरासमोरून उचलून नेले. त्यानंतर गावाबाहेरील निर्जन ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी पिडीतीचे आईने दिलेल्या तक्रारीवरून माना पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी फरार झाला होता. सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयातील आरोपीचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक व गोपनीय माहीतीचे मदतीने शोध लावला. आरोपी उज्वल आत्माराम नाईक हा उल्हासनगर, जि.ठाणे येथे असल्याची माहीती प्राप्त झाल्याने स्थानिक गुन्हे शाखा अकोला येथील तपास पथकाने उल्हासनगर जि. ठाणे येथे जावुन सदर आरोपीला ताब्यात घेतले. पुढील तपास माना पोलिस करीत आहेत.

# भाजपच्या 'जनरल कायर'ने केला लाठीचार्ज

## राऊतांचा सरकारवर निशाणा



प्रतिनिधी २१ जुलै

**मुंबई :** दिल्लीमध्ये जे आंदोलन सुरू आहे तिथे जमलेले लोकं कोणत्या व्यक्तीच्या मागे तिथे आलेले नाहीत. राहुल गांधी आणि आम्ही सर्वांनी नीट पेपरफुटीचा मुद्दा उचलून धरला त्यातून ही लढाई सुरू झाली, त्या लढाईत तेल ओतण्याचे काम देशाचे सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी केले, त्यामुळे हा भडका उडाला आहे.

पेपरफुटीचे केंद्र हे महाराष्ट्र आहे त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारला पाहिजे, यात आरएसएस लोकं आहेत, असे उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, लोकं बाहेरून आले म्हणून आंदोलन यशस्वी होत नाही, आम्ही सर्व जण आंदोलनाच्या पाठिशी आहोत म्हणून ते आंदोलन होत आहे. पत्रकारांनी सरकारची गुलामगिरी करू नये, असे म्हणत त्यांनी पत्रकारांवर रोष व्यक्त केला. नरेंद्र मोदी, अमित शहा यांनी देशातील तरुणांवर हल्ला केला आहे, हे ब्रिटिश काळात जालियनवाला बाग हत्याकांडात दिसले.

संजय राऊत म्हणाले की, काल दिल्लीमध्ये जो प्रकार झाला त्यानंतर मला जालियनवाला बाग हत्याकांडाची आठवण झाली. तिथे जनरल डायरने गोळ्या घातल्या इथे भाजपच्या जनरल कायरने तरुणांवर लाठीचार्ज केला, अश्रूधूर सोडला, यामध्ये लहान लहान मुलींचा आक्रोश पाहिला. यांना मुलंबाळ नसल्याने आणि जी आहेत ती परदेशात सुरक्षित असल्याने त्यांना आमच्या भारतामधील मुलांचे आणि त्यांच्या आई-वडीलांचे दु:ख कळणार नाही. कालचा दिवस हा लोकशाहीमधील काळा दिवस होता, यापुढे २० जुलै हा डरपोक दिवस म्हणून साजरा केला पाहिजे.

# प्रियकरानेच अश्लील व्हिडीओ काढून गर्लफ्रेंडला केलं ब्लॅकमेल!

प्रतिनिधी २१ जुलै


**पुणे:** पुण्यातील वाघोली परिसरात एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका २० वर्षीय तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून मुख्य आरोपीने तिच्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केला. एवढ्यावरच न थांबता आरोपीने आपल्या तीन मित्रांनाही तिच्यावर अत्याचार करण्यास भाग पाडले. तसेच पीडितेचे अश्लील व्हिडिओ चित्रीत करून ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत तिचा छळ केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध बलात्कार, धमकी आणि इतर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी यातील दोघांना अटक केली असून, फरहान रिझवान शेख (वय २०) आणि फजल शेख (वय २०, दोघे रा. विमाननगर) अशी त्यांची नावे आहेत. न्यायालयाने या दोघांनाही २० जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. तर या प्रकरणातील तिसरा आरोपी साहिल दिंडोरे (वय २०) फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. चौथा आरोपी अल्पवयीन आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणीची ओळख मुंढवा येथील रहिवासी फरहान रिझवान शेख याच्याशी झाली होती. या नात्याचा गैरफायदा घेत फरहानने तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर २ नोव्हेंबर २०२५ ते ३ जून २०२६ दरम्यान वाघोली येथील लेक्सिकॉन कॉलेज जवळील सहारा पीजी आणि खराडीतील पंचशील टॉवरच्या मागील परिसरात नेऊन तिच्यावर वारंवार बलात्कार केला. मुख्य आरोपी फरहान याने केवळ स्वतः अत्याचार केला नाही, तर त्याचे मित्र फजल शेख, साहिल दिंडोरे आणि एका अल्पवयीन मुलालाही पीडितेवर अत्याचार करण्यास भाग पाडले. या चौघांनी मिळून तरुणीवर अत्याचार केले आणि त्याचे अश्लील व्हिडिओ बनवले. हे व्हिडिओ इंटरनेटवर टाकण्याची धमकी देऊन ते तिच्यावर सतत दबाव आणत होते.सततचा अत्याचार, धमक्या आणि मानसिक छळाला कंटाळून पीडित तरुणीने अखेर हिंमत दाखवत वाघोली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. तपासादरम्यान आरोपींचे मोबाईल फोन, चॅट्स, कॉल रेकॉर्ड्स आणि अश्लील व्हिडिओ जप्त करून ते फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण पुणे शहरात खळबळ उडाली असून, वाघोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# अकोल्यात माणुसकीला काळीमा !

## लिफ्ट देण्याच्या बहाण्याने चारचाकीत महिलेवर अत्याचार | त्या दोघा नराधमांवर गुन्हा दाखल होणार का ?

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला :** मदतीचा आव आणून, गोड बोलून एका पीडित महिलेला चारचाकीत बसवून तिच्यावर पाशवी लैंगिक अत्याचार केल्याची अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. पातूरच्या घाटात धावत्या गाडीत हा भयंकर प्रकार घडला असून, 'विरोध केल्यास जिवाने मारून फेकून देऊ' अशी धमकीही या नराधमांनी दिली. या घटनेमुळे अकोला जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी पीडित महिलेने अकोल्याच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात तक्रार दाखल केली असून कौलखेड येथील दोघे आरोपी असून या दोन आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना तात्काळ गजाआड करण्याची



जोरदार मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरत येथून अकोल्यात आलेल्या पीडित महिलेला मालेगाव तालुक्यातील नागुरतास येथे देवीच्या दर्शनासाठी व भावाला भेटण्यासाठी जायचे होते. अकोल्यातील वाशीम बायपासवर त्या बसची वाट पाहत उभ्या असताना, एका पांढऱ्या रंगाच्या कारमधून आलेल्या दोघांनी गाडी थांबवली. 'एवढ्या उन्हात का उभ्या आहात? आम्ही तिकडेच चाललोय, तुम्हाला मंदिरापाशी सोडून देतो,' असे सांगून आरोपींनी महिलेचा विश्वास संपादन केला आणि तिला गाडीत बसवले.

लिफ्ट देण्याच्या बहाण्याने महिलांच्या सुरक्षेशी खेळणाऱ्या अशा विकृत आणि नराधम आरोपींना पोलीस तत्काळ अटक करून कडक कायदेशीर धडक कारवाई करणार की प्रशासनाकडून दिरंगाई होणार? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून पीडितेला त्वरित न्याय मिळणे गरजेचे आहे. ऑनलाईन झालेल्या तक्रारीचा एफ आय आर नोंदविला गेला की नाही त्याच बरोबर या प्रकरणात चौकशी,अटक केल्या गेली काय अशी विचारणा होत आहे.

### पातूर घाटात पाशवी कृत्य व जिवाने मारण्याची धमकी!

» गाडी काही अंतरावर गेल्यावर या दोघांमधील नराधम जागा झाला. त्यांनी गाडीतच पीडित महिलेशी अश्लील चाळे करण्यास सुरुवात केली. महिलेने त्याला तीव्र विरोध केला असता, आरोपींनी 'गप्प बस, नाहीतर जिवाने मारून बाहेर फेकून देऊ!' अशी थेट धमकी दिली. या धमकीमुळे भयभीत झालेल्या हतबल महिलेवर आरोपींनी पातूरच्या घाटात धावत्या गाडीतच अत्याचार केला. एवढेच नव्हे तर, 'झालेला प्रकार कोणाला सांगितलास तर गंभीर परिणाम होतील,' असा धाक दाखवून आरोपींनी तिला मंदिरासमोर सोडून पळ काढला

# शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी उद्या जाहीर होणार

## 30 जुलैपूर्वी शेतकऱ्यांचा बँक खात्यात पैसे जमा होणार

प्रतिनिधी २१ जुलै



**मुंबई:** राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. राज्य सरकारच्या शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत लाभार्थींची प्राथमिक यादी उद्या (२२ जुलै) जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच, ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल, अशी स्पष्ट ग्वाहीही त्यांनी दिली. एका वृत्तवाहिनीशी बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले की, कर्जमाफीला विलंब होण्यामागे काही तांत्रिक आणि प्रशासकीय कारणे होती. सुरुवातीला ३० जूनपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. मात्र, पावसाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांना राज्यपालांची मंजुरी मिळणे आवश्यक होते. त्यानंतर आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची अंतिम माहिती केंद्र सरकारकडून मिळणेही गरजेचे होते. आता हा डेटा सरकारकडे प्राप्त झाला असून प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. कृषिमंत्र्यांनी सांगितले की, २२ जुलै रोजी अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त प्राथमिक लाभार्थी यादी जाहीर करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

त्यानंतर टप्प्याटप्प्याने पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात रक्कम वर्ग केली जाईल. राज्य सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले की, ३० जुलैपूर्वी पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात कर्जमाफीची रक्कम जमा केली जाईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

### सरकारचा धडक कारवाईचा बडगा

» यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बोगस आणि निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाईचीही माहिती दिली. खरीप हंगामात बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत राज्यभरातून ११,५८४ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यापैकी ८,१९२ प्रकरणांची तपासणी करण्यात आली असून ७,४२२ नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. या तपासणीत ७६३ नमुने निकृष्ट किंवा अमान्य आढळले असून संबंधित ८१ कंपन्यांविरोधात एफआयआर दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. दोषी कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.सोयाबीन बियाण्यांच्या उगवण क्षमतेबाबत सर्वाधिक तक्रारी अकोला, अमरावती, बुलढाणा आणि यवतमाळ या जिल्ह्यांतून प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणांमुळे १ लाख ६३ हजार ८५१ हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र प्रभावित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

# दिल्लीतील आंदोलन केवळ नौटंकी चंद्रशेखर बावनकुळेंची टीका!

प्रतिनिधी २१ जुलै

मुंबई : दिल्लीत विद्यार्थ्यांच्या मोर्चावर झालेल्या लाठीचार्जवरून आणि पेपरफुटीच्या मुद्द्यावरून राजकारण तापले असताना, भाजपने विरोधकांवर जोरदार पलटवार केला आहे. 'दिल्लीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन हे केवळ सरकारला जाणीवपूर्वक बदनाम करण्यासाठी आणि देशातील युवकांच्या मनात द्वेष निर्माण करण्यासाठी रचलेली निव्वळ 'नौटंकी' आहे,' असा आरोप भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

एवढेच नव्हे तर, 'आंदोलनादरम्यान दगडफेक करण्यासाठी २ ते ३ ट्रक भरून गोटे आणले गेले होते,' असा दावा करत यामागील असामाजिक घटकांची कडक चौकशी केली जाईल, असेही ते म्हणाले.दिल्लीतील आंदोलनावर आणि पेपरफुटी प्रकरणावर भाष्य करताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, 'परीक्षेचा पेपर फुटला ही निसंशयपणे एक मोठी चूक आहे, त्यात कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही.

परंतु, याचा अर्थ असा होत नाही की केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान किंवा केंद्र सरकारने स्वतः जाऊन तो पेपर फोडला आहे. प्रशासकीय व्यवस्थेत (सिस्टीम) कुठेतरी बदमाशी आणि गैरप्रकार झाला आहे. त्याची जबाबदारी स्वीकारून सरकारने स्वतःहून या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे आणि चौकशीसाठी निष्पक्ष तपास यंत्रणा नेमली आहे.'

ते पुढे म्हणाले, 'तपास यंत्रणा आपले काम करत असतानाही विद्यार्थ्यांना भडकावून रस्त्यावर उतरवणे हा निव्वळ राजकीय कट आहे. कालच्या आंदोलनात अचानक जी दगडफेक झाली, ती उस्फूर्त नव्हती. त्यासाठी आधीच २ ते ३ ट्रक भरून दगड गोळा करून आणले गेले होते. ही दगडफेक कुणी केली? त्यामागे कोणते असामाजिक तत्त्वे आहेत? याचा सखोल तपास झाला पाहिजे.'

सिटी न्यूज सुपरफास्ट
विविधा
२
मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे जनक : वि.स. पागे

विठ्ठल सखाराम तथा वि. स. पागे हे महाराष्ट्रातील एक ज्येष्ठ गांधीवादी नेते, स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत आणि 'महाराष्ट्र रोजगार हमी योजनेचे' जनक होते. सांगली जिल्ह्यातील बागणी येथे जन्मलेल्या पागे यांनी कायदेभंगाच्या चळवळीत आणि भारत छोडो आंदोलनात तुरुंगवास भोगला होता. ग्रामीण भागातील जनतेच्या हाताला काम मिळवून देण्याच्या उद्देशाने त्यांनी आखलेली 'रोजगार हमी योजना' पुढे संपूर्ण भारतासाठी आणि जागतिक पातळीवर आदर्श ठरली. त्यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापतिपद सलग १८ वर्षे अत्यंत संयमाने आणि कायदेविषयक अभ्यासाने सांभाळले. राजकारणासोबतच भारतीय संस्कृती, संस्कृत वाङ्मय आणि संतवाणी यावर त्यांचे गाढे प्रभुत्व होते. त्यांनी सांगलीच्या विलिंग्डन महाविद्यालयातून संस्कृत विषयात बी.ए. आणि कोल्हापूरच्या विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. पदवी पूर्ण केली.

वि. स. पागे यांची आज जयंती. त्यांचे पूर्ण नाव विठ्ठल सखाराम पागे. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील बागणी येथे २१ जुलै १९१० रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण तासगाव येथे झाले. ते सातव्या इयत्तेत पहिले आले होते. त्यानंतर ते संस्कृत विषय घेऊन बी.ए. झाले. त्यानंतर त्यांनी एलएलबी ही कायद्याची पदवी घेतली. लहानपणापासूनच त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. वाळवा हा तालुका क्रांतिकारकांचा तालुका म्हणून ओळखला जातो. १९३० ची 'कायदेभंगाची चळवळ' तसेच १९४२ चे 'भारत छोडो' आंदोलन यामध्ये त्यांनी भाग घेतला होता. त्यांनी तुरुंगवासही भोगला होता.

वै. पागे यांच्या कारकीर्दीत अनेक मातब्बर नेते सभागृहाचे सदस्य होते. विधिमंडळाच्या कामकाजाच्या नियमांचा अतिशय सूक्ष्म अभ्यास करून सरकारला कचाटय़ात पकडणारे जागरूक नेते विरोधी पक्षांमध्ये होते. अशावेळी कै. पागे अतिशय शांतपणे, कायदे आणि नियमांचा अर्थ लावून सुस्पष्ट निर्णय देत, की तो आपोआपच सर्वांना मान्य ठरत असे. परंतु त्यांच्या विधिमंडळातील कारकीर्दीपेक्षाही त्यांची आठवण महाराष्ट्राला व देशाला राहील ती 'रोजगार हमी योजने'चे जनक म्हणूनच. 'रोजगार हमी योजनेचा' कायदा तयार करून सरकारला सादर करून त्यांची अंमलबजावणी करायला लावणे. तिच्या प्रगतीचा आढावा घेणे आणि कालानुरूप तिच्यात बदल सुचविणे ही सारी कामे कै. पागे यांनी केली. एखाद्या राज्याच्या विकासकार्यात इतक्या महत्त्वाच्या प्रश्नासाठी एखाद्या नेत्याने एवढय़ा मोठय़ा प्रमाणावर कार्य केल्याचे दुसरे उदाहरण क्वचितच असेल. अकुशल ग्रामीण बेरोजगारांना स्वत:च्या परिसरामध्ये रोजगार प्राप्त करून देणारी ही योजना कोटय़वधी बेरोजगारांना अक्षरश: वरदानच




ठरली आहे. या योजनेमुळे शहरांकडे जाणाऱ्या लोंढय़ांचे स्थलांतराचे प्रमाण नि:संशयपणे कमी झाले आहे. १९६९ साली कै. श्री. पागे यांच्या सांगली जिल्ह्यातील विसापूर गावी सदर योजना प्रथम सुरू झाली व नंतर व्यापक प्रमाणावर राबविण्यात आली.

सदर योजनेचा गौरव संयुक्त राष्ट्रसंघात करण्यात आला आहे. काही मागास आफ्रिâकन देशांमध्ये ही योजना संयुक्त राष्ट्रसंघातर्फे राबविण्यात येत आहे. पंतप्रधान मनमोहनसिंग यांना त्यांची उपयुक्तता पटली व सदर योजनेबाबत कायदा संसदेमध्ये संमत करून त्यांची देशभर तातडीने अंमलबजावणी करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये ग्रामीण बेरोजगारी हटविण्याची क्षमता असल्याने दरवर्षी अंदाजपत्रकामध्ये वाढीव तरतूद भारत सरकारतर्फे करण्यात येत आहे.

महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दाखविणारे कै. श्री. पागे हे अभ्यासू चिंतक होते. विधिमंडळाबद्दल त्यांनी काही विचार व्यक्त केले आहेत. शैक्षणिक, सांस्कृतिक, समाजकल्याण विषयक बाबी संबंधीची विधेयके विधान परिषदेत मांडून विधानसभेच्या कामाचा व्याप कमी करता येईल असे त्यांनी सुचविले होते. अध्यात्म, संतवाङमय आणि संसदी परंपरा हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय होते. त्यावर बोलताना वि. स. पागे रंगून जात असत. त्यांच्या निवेदनात रसाळपण तर असेच पण या विषयांचा गाढ अभ्यासही जाणवत असे. संस्कृत भाषेचा त्यांचा व्यासंगही दांडगा होता. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या भाषणांमधून सतत जाणवत असे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे त्यांच्या भाषेलाही संस्कृतच्या सहवासामुळे एक अभिजात भारदस्तपणा प्राप्त झालेला होता.

पागे व नाईक दोघेही ग्रामीण भागातील असल्याने त्यांना शेतकरी व कामकरी यांच्या प्रश्नांची चांगली जाण असल्यामुळे रोजगारनिर्मिती व त्यातून विकास साधण्याची खरी प्रक्रिया सुरू झाली. रस्ते, पाझर तलाव, नाला बंडिंग, विहिरी अशा प्रकारची कामे सुरू झाली. पागे हे कवी, नाटककार होते. त्यांचे 'पहाटेची नौबत' आणि 'अमरपक्षी' या नावाचे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांनी 'वीर मोहन' नावाचे नाटक लिहिले होते. तसेच 'निवडणुकीचा नारळ' नावाची नाटिका लिहिली होती. 'तुका म्हणे जाऊ वैकुंठा चालत' हे संगीत नाटक त्यांनी लिहिले. १६ मार्च, १९९० रोजी त्यांचे निधन झाले.

### असा झाला रोजगार हमी योजनेचा जन्म!



'रोजगार हमी योजने'च्या कल्पनेबद्दल एक गोष्ट सांगितली जाते. महाराष्ट्रात साधारण १९७१ ते १९७४ या कालावधीमध्ये दुष्काळ पडला होता. यावेळी शेतकरी व कामकरी यांची परिस्थिती गंभीर झाली होती. दुष्काळाच्या या परिस्थितीचा विचार करीत ते एकदा आपल्या घराr झोपाळ्यावर बसले होते. त्यांनी त्यांच्या पत्नीला विचारले, 'प्रभा, घरात पैसे किती आहेत?' प्रभाताईंनी सांगितले की, 'सातशे रुपये आहेत.' 'त्यावर त्यांनी विचारणा केली, 'सातशे रुपयांत शेतावर किती गडी राबू शकतील?' घरातून सांगण्यात आले की, 'वीस दिवस चौदा-पंधरा गडी सहज लावता येतील.' मग काय त्यांनी थेट मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनाच पत्र लिहायला घेतलं. त्यातील मजकूर असा होता. 'माननीय मुख्यमंत्री साहेब, माझ्या शेतावर सातशे रुपयांत चौदा-पंधरा दिवस वीस गडी मजुरीला लावता आले. शंभर कोटी रुपये बाजूला काढलेत, तर किती मजुरांना काम देता येईल?' रोजगार हमी योजनेचा जन्म या चार ओळींमध्ये झाला. वसंतराव नाईक यांनी लगेचच पागे यांना बोलावून घेतले. नेमकं काय करायला हवं ते सगळं विचारून घेतलं. योजना फारच छान होती. पण शंभर कोटी रुपये कुठून आणायचे? या प्रश्नाने मुख्यमंत्री चिंतेत पडले. त्यावेळी शंभर कोटी रुपये खूप मोठी रक्कम होती. त्यांनी या विषयावर विरोधी पक्षनेत्यांसह खास बैठक बोलावली. या बैठकीत त्यावेळचे विधानसभेतले विरोधी पक्षनेते कृष्णराव धुळप उपस्थित होते. ते म्हणाले, 'नाईकसाहेब, गरिबांना काम देत असाल तर या योजनेसाठी शंभर कोटी रुपये उभे करण्यासाठी विधानसभेत आम्ही कर प्रस्ताव घेऊन येतो.' जगाच्या संसदीय लोकशाही इतिहासात पहिल्यांदाच सत्ताधारी पक्षाला संपूर्णपणे मदत करण्यासाठी 'कर प्रस्ताव' आणण्याची भूमिका सर्वप्रथम महाराष्ट्रातच घेतली गेली.

# पाकव्याप्त काश्मीरची भारतात 'घरवापसी' करतांना भारताची भूमिका काय असावी ?

पाकव्याप्त काश्मीरमध्ये ७ जून २०२६ पासून तेथील स्थानिक जनतेचे पाकिस्तानी सत्तेविरोधात आंदोलन चालू आहे. विविध ठिकाणी विशेषकरून रावळकोट या शहरात एकत्र येऊन आंदोलन करणारा मोठा समुदाय हे त्याचे प्रतिनिधिक रूप असून त्याचे व्हिडिओ आणि छायाचित्रे आता जगभर झाली आहेत.

**१. आंदोलकांच्या मागण्या**

आंदोलकांच्या ३८ कलमी मागण्या आहेत. त्यांचे सार हेच की, त्यांच्या भूप्रदेशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा त्यांना उचित वाटा मिळावा, अन्य पाकिस्तानींना जे स्वातंत्र्य आहे तेवढे तरी मिळावे, विकास व्हावा आणि मूलभूत गरजा पुरवाव्यात इत्यादी.

**२. पाक सत्ताधिशांची भूमिका**

पाकिस्तानातील सत्ताधिशांनी हे आंदोलन चिरडून काढायचा निश्चय केला आहे. एकही मागणी मान्य करण्यात आलेली नाही. पाकव्याप्त काश्मीरमध्ये बाहेरून अन्नधान्यही येऊ दिले जात नाही, अशी स्थिती तेथे आहे; जणू एक भूप्रदेश तुरुंग बनावा, असे काहीसे आहे.

**३. आंदोलनाच्या पाठीराख्यांची भारताकडून अपेक्षा**

आंदोलकांपैकी काहींनी, विदेशातून त्यांची पाठराखण करणाऱ्या काहींनी 'भारताने आता पाकव्याप्त काश्मीरकडे लक्ष वळवून त्यावर ताबा मिळवावा, या प्रदेशातील जनतेचे कल्याण करावे', ही भूमिका या ना त्या प्रकारे मांडलेली आहे. उदाहरणार्थ डॉ. अमजद अयुब मिर्जा या विदेशात राहून जुलुमी पाकिस्तानी सत्ताधिशांच्या विरोधात सातत्याने आवाज उठवणाऱ्या नेत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काही दिवसांपूर्वी यासंबंधाने 'भारताने हस्तक्षेप करावा', असे आवाहनही केले होते. काश्मीर खोऱ्यातही सीमेपलीकडील बांधवांविषयी सहानुभूती व्यक्त केली जात आहे. भारतातही 'हा भूप्रदेश भारताने स्वतःच्या ताब्यात घ्यावा', असे विचार मांडले जात आहेत.

**४. पाकव्याप्त काश्मीर पाकिस्तानपासून तुटणारच !**

येथे पाकव्याप्त प्रदेशातील काश्मिरी आणि त्यांची मागणी यांविषयी काही सूत्रे बारकाईने लक्षात घ्यायला हवीत. या काश्मिरींना पाकिस्तानमध्ये पुष्कळच जाच होत आहे. या तुलनेत भारतात असलेल्या काश्मिरींना पुष्कळच सुख-सुविधा, विकास इत्यादींचा होत असलेला लाभ हा त्यांच्यासाठी स्वप्नवत आहे. पाकव्याप्त काश्मीरमधील जनतेने आंदोलनातून अप्रसन्नता व्यक्त करण्याची आणि इस्लामाबादने त्याला काहीही करून दडपण्याची ही पहिली वेळ नाही. प्रत्येक दडपशाहीने येथील जनमानसाला घायाळ करून ठेवले आहे. या वेळची दडपशाही पहाता त्या जखमा भरण्याची शक्यता नाही. या सर्वांमुळे आज ना उद्या हा भाग पाकिस्तानपासून तुटणारच !

**५. विलीनीकरणवाद्यांची इच्छा**

'ही प्रक्रिया जलद व्हावी. त्यातून पाकव्याप्त काश्मीर भारतात यावे, यासाठी भारताने सक्रीय भूमिका घ्यावी', अशी अनेक भारतियांचीही इच्छा आहे. भारत सरकारने तेथील पाककृत मानवी हक्कभंगाविषयी कायमच टीका केली आहे. 'बांगलादेश निर्मितीसाठी तेथील मंडळींना भारताने जसे सर्वतोपरी सहकार्य केले, तसे करावे', असे वाटणाराही वर्ग आहे.

**६. पाकव्याप्त काश्मीरवर ताबा, हा भारताचा न्याय्य हक्क !**

मुळातच हा प्रदेश स्वातंत्र्यपूर्व जम्मू-काश्मीर संस्थानचा भाग होता. वर्ष १९४८ मध्ये तत्कालीन पाक लष्कराने कबालींच्या (पठाणांच्या) आडून घुसखोरी केली. या संस्थानचे अधिपती महाराजा हरिसिंह यांनी विलीनीकरणपत्रावर स्वाक्षरी करून कायद्याने हा भूप्रदेश भारतात विलीन केला. मग पाक घुसखोरीला विरोध करण्यासाठी भारतीय सैन्य काश्मीरमध्ये उतरले. सैन्याने घुसखोरी आटोक्यात आणली. अचानक तत्कालीन पंतप्रधान नेहरूंनी एकतर्फी युद्धविराम घोषित करत प्रश्न तत्कालीन संयुक्त राष्ट्र संघात नेला. मग सध्या पाकव्याप्त असलेला भूप्रदेश पाकिस्तानच्या अधिकारात आहे तसाच राहिला. काँग्रेस नेते नरसिंहराव पंतप्रधान असतांना भारतीय संसदेने 'पाकव्याप्त काश्मीर हा भारताचेच अंग आहे', असा एकमुखी ठराव करत यासंबंधी भारतीय जनतेची इच्छा स्पष्ट शब्दांत व्यक्त केली आहे.

**७. 'लेट अस फिनीश द जॉब'**

वर्ष १९७१ मध्ये भारतीय सैन्याने कारवाई करत पूर्व पाकिस्तान नावाने ओळखला जाणारा, खरेतर मूळ अखंड भारताचाच भाग असलेला प्रदेश मुक्त करत 'बांगलादेश' या नव्या देशाची निर्मिती केली. या यशस्वी कारवाईत ९३ सहस्र पाक सैनिक बंदीवान बनवून भारतात आणले गेले. त्या वेळी भारतीय सैन्याचे सेनाधिपती सॅम माणेकशॉ यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना विचारले होते, 'तुम्ही अनुमती द्या. 'लेट अस फिनीश द जॉब'!' याचा अर्थ 'आता पश्चिम सीमेवर कारवाई करत आधीच दुबळ्या बनलेल्या पाक सैन्याचे उरलेसुरले कंबरडे मोडून स्वतःचा भूभाग आपल्या ताब्यात घेऊया.' पंतप्रधान इंदिरा गांधींनी याला अनुमती दिली नाही. थोडक्यात पाकव्याप्त काश्मीरचे विलीनीकरण भारतात व्हावे, ही प्रस्तुत लेखकासहित प्रत्येक भारतियाची इच्छा आहेच. असे असले, तरी काही वास्तवाचे भान येथे आपल्याला असायला हवे.

**८. भारतियांनो, हे ऐतिहासिक सत्य विसरू नका !**

काश्मीरचे महान हिंदु सम्राट ललितादित्य यांच्या काळात (इसवी सन ७२४ ते ७६०) सध्याच्या पाकव्याप्त काश्मीरसह संपूर्ण जम्मू-काश्मीर आणि आसपासच्या विशाल भूभागावर (म्हणजे अगदी ताश्कंदपर्यंत) कर्कोट घराण्याचे अधिकृत राज्य होते. या प्रदेशातील बहुतांश लोकसंख्या हिंदु आणि बौद्ध धर्मीय होती. स्वतः सम्राट ललितादित्य हे हिंदु धर्मीय होते; परंतु त्यांनी बौद्ध धर्मालाही राजाश्रय दिला होता. त्यांनीच प्रसिद्ध मार्तंड सूर्य मंदिर आणि शारदा पीठाची भव्य बांधकामे केली. काश्मीर खोऱ्यात आणि आजच्या पाकव्याप्त भागात इस्लामचा मोठ्या प्रमाणावर प्रसार १४ व्या शतकात मध्य आशियातून सूफींचे आगमन झाल्यावर झाला. त्यापूर्वी तिथे मुसलमान नव्हतेच.

लेखाच्या पुढील भागात पाकव्याप्त काश्मीरचे भारतात विलीनीकरण या सूत्राकडे पहाण्याविषयी तेथील स्थानिकांची आणि भारताची भूमिका यांतील नेमका भेद स्पष्ट होईल. त्या आधारे जेव्हा भारताला यासाठी प्रत्यक्ष काही करावे लागेल त्या वेळी कोणत्या सूत्रांचे भान असायलाच हवे, हेही स्पष्ट होईल.

(क्रमशः)

**डॉ. दुर्गेश सामंत, गोवा**

# करिअरमधील 'मिक्स अँड मॅच'!

कामाशी संबंधित नसलेल्या विषयाचा अभ्यास करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड विषय/कोर्स नेहमीच फायदेशीर ठरतो. करिअरमधील याच 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्स विषयी जाणून घ्या... एका विषयात पदवी शिक्षण घेतलेले दुसऱ्याच क्षेत्रात कार्यरत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. जसे की, बीए (इतिहास), कम्प्युटर कोर्स केलेले एखाद्या कंपनीच्या एचआर विभागात कार्यरत आहेत किंवा प्राणीशास्त्रातील बीएससी पदवी आणि एखाद्या कंपनीच्या विपणन विभागात काम करतात. सध्या 'मिस अँड मॅच'चा ट्रेंड वाढताना दिसत आहे. पण या सगळ्यात एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे आपले दुर्लक्ष होते आहे, तो म्हणजे नोकरीच्या क्षेत्राशी पूर्णपणे किंवा अंशतः संबंधित कोर्सचा अभ्यास करण्यास काय हरकत आहे? लक्षात घ्या, इथे मी जॉब-ओरिन्टेड कोर्सबाबत बोलत नसून अशा 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्सेसबाबत बोलत आहे. यामुळे स्पर्धात्मक काळात दुसऱ्यांपेक्षा एक पाऊल पुढे राहण्यास मदत होईल. असे हे 'इंटर-रिलेटेड' किंवा 'कॉम्बिनेशन' कोर्स करण्याचे विविध फायदे समजून घेणे महत्त्वाचे आहे. केवळ पदवीवर उत्तम नोकरी मिळवण्याचा काळ राहिलेला नाही. लक्षात घ्या, सध्याची वाढती लोकसंख्या बघता आणि स्वतःचे वर्चस्व, अस्तित्व टिकवण्यासाठी बऱ्याच कंपन्यांनी हायर अँड फायर या धोरणाचा स्वीकार केलेला आहे. अशा परिस्थितीत एकाच क्षेत्रात पारंगत असलेल्या व्यक्तींपेक्षा बहु-प्रतिभावान व्यक्ती टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे. उदाहरणार्थ, सध्या कम्प्युटरचे ज्ञान हे अतिरिक्त शैक्षणिक पात्रता म्हणून पाहिले जात नाही. पण कोणत्याही उद्योगात ती आवश्यक पात्रता आहे. आधी नमूद केल्याप्रमाणे घेतलेले शिक्षण आणि त्या शिक्षणाचा संबंध नसलेल्या क्षेत्रात काम करण्यापेक्षा इंटर-रिलेटेड कोर्स हे यशस्वी कारकीर्द बनवण्याचा मार्ग नक्कीच सोपा करतात. एका विषयातील ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या विषयाच्या पायाबांधणीसाठी होतो. इंटर-रिलेटेड कोर्सचा अजून एक फायदा म्हणजे एका विषयातील ज्ञानाचा उपयोग दुसऱ्या विषयात करता येतो. जसे की, भाषेवरील प्रभुत्व (उदारणार्थ, मराठी भाषा) आणि पत्रकारितेचा अभ्यासक्रम एकमेकांना पूरक आहे. कारण भाषेचा पाया मजबूत असल्यामुळे पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाशी जुळवून घेणे अधिक सोपे होते. अशा प्रकारे एका कोर्सचे ज्ञान दुसऱ्या कोर्सच्या कामकाजात सहजपणे लागू केले जाते. 'जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वन' ही म्हण सगळ्यांच्या परिचयाची असेल. पण आजच्या अटीतटीच्या स्पर्धेत जॅक ऑफ ऑल अँड मास्टर ऑफ वनची गरज अधिक आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. सखोल ज्ञान असल्यामुळे वस्तुनिष्ठ विश्लेषण, योग्य नियोजन आणि उत्तम कामगिरी करण्याची शक्यता अजून वाढते. विषय, उद्योग, ग्राहकांचा कल याबाबत सखोल ज्ञान असल्यामुळे व्यावसायिक आणि वैयक्तिक पातळीवर भरभराट होण्यास मदत होतेच, पण त्याचबरोबर निष्काळजीपणा, तक्रारी, गैरजसमजदेखील कमी होण्यास मदत होते.

# राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांची आजच्या दिवशी राष्ट्रपतीपदी निवड



द्रौपदी मुर्मू या भारताच्या १५ व्या आणि विद्यमान राष्ट्रपती आहेत. २१ जुलै २०२२ रोजी राष्ट्रपती म्हणून त्यांची निवड झाली. तर, त्यांनी २५ जुलै २०२२ रोजी या सर्वोच्च पदाची सूत्रे हाती घेतली. भारताच्या राष्ट्रपती बनणाऱ्या त्या पहिल्या आदिवासी महिला आणि स्वतंत्र भारतात जन्मलेल्या सर्वात तरुण राष्ट्रपती आहेत. त्यांचा जीवनप्रवास अत्यंत संघर्षाचा, प्रेरणादायी आणि समर्पित राहिला आहे.

**वैयक्तिक आणि कौटुंबिक पार्श्वभूमी**

जन्म: २० जून १९५८ (उपरबेडा गाव, मयूरभंज जिल्हा, ओडिशा). संथाळ आदिवासी जमाती मध्ये त्यांचा जन्म झाला. भुवनेश्वर येथील रमादेवी महिला महाविद्यालयातून त्यांनी कला शाखेतून बीएची पदवी पूर्ण केली.

कुटुंब: त्यांचा विवाह श्यामाचरण मुर्मू यांच्याशी झाला. त्यांच्या आयुष्यात मोठा वैयक्तिक आघात झाला—त्यांनी पती आणि दोन तरुण मुले गमावली. या अत्यंत कठीण प्रसंगातून सावरून त्यांनी समाजसेवेचा मार्ग निवडला. त्यांना 'इतिश्री मुर्मू' नावाची एक मुलगी आहे.

कारकीर्दीची सुरुवात, सरकारी सेवा: १९७९ ते १९८३ या काळात त्यांनी ओडिशाच्या पाटबंधारे व ऊर्जा विभागात लिपीक/कनिष्ठ सहाय्यक म्हणून काम केले.

शिक्षक: पुढे रायरंगपूर येथील श्री अरविंदो इंटिग्रल एज्युकेशन सेंटरमध्ये त्यांनी मानद सहाय्यक शिक्षक म्हणून सेवा बजावली. राजकीय प्रवास,

द्रौपदी मुर्मू यांनी १९९७ मध्ये भारतीय जनता पक्षातून आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली:

नगरसेवक ते अध्यक्ष: १९९७ मध्ये त्या रायरंगपूर नगरपरिषदेच्या नगरसेविका म्हणून निवडून आल्या आणि नंतर उपाध्यक्ष बनल्या.

**आमदार आणि मंत्री (ओडिशा सरकार):** रायरंगपूर मतदारसंघातून त्या २००० आणि २००४ मध्ये आमदार म्हणून निवडून आल्या.

२००० ते २००४ दरम्यान त्यांनी बीजू जनता दल (BJD) आणि भाजपच्या युती सरकारमध्ये वाणिज्य आणि वाहतूक, तसेच मत्स्यव्यवसाय आणि पशुसंवर्धन विभागाच्या राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) म्हणून काम पाहिले.

उत्कृष्ट आमदार पुरस्कार: २००७ मध्ये ओडिशा विधानसभेने त्यांना सर्वोत्कृष्ट आमदाराचा 'नीलकंठ पुरस्कार' देऊन गौरविला.

**राज्यपाल आणि राष्ट्रपती पद**

झारखंडच्या राज्यपाल (२०१५ - २०२१): २०१५ मध्ये त्यांची झारखंडच्या नवव्या राज्यपाल म्हणून नियुक्ती झाली. झारखंडच्या ५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या महिला राज्यपाल ठरल्या.

भारताच्या १५ व्या राष्ट्रपती (२०२२ - वर्तमान): राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) कडून त्यांची राष्ट्रपतीपदाची उमेदवारी जाहीर झाली. विरोधी उमेदवार यशवंत सिन्हा यांचा पराभव करून २५ जुलै २०२२ रोजी त्यांनी भारताच्या राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली.

**महत्त्वाची वैशिष्ट्ये:**

पहिली आदिवासी महिला राष्ट्रपती: देशातील सर्वोच्च संवैधानिक पदावर पोहोचणाऱ्या आदिवासी समाजाच्या पहिल्या व्यक्ती.

स्वातंत्र्योत्तर काळातील जन्म: स्वतंत्र भारतात जन्मलेल्या भारताच्या पहिल्या राष्ट्रपती. अत्यंत संयमी आणि आध्यात्मिक व्यक्तित्व: वैयक्तिक आयुष्यातील दुःखांचा डोंगर पचवून त्यांनी अध्यात्म (विशेषतः ब्रह्माकुमारी संस्था) आणि समाजसेवेला आपले जीवन समर्पित केले.

# सेवा हाच धर्म - हेच देवाभाऊंचे व्रत

## तोंडात साखर, डोक्यात बर्फ, पायात चक्री



आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र गंगाधर फडणवीस यांचा वाढदिवस. राज्यभरात त्यांना प्रेमाने "देवाभाऊ" म्हणून ओळखले जाते. फॅशन आणि दिखाव्याच्या या काळात स्वतःचा वाढदिवस सार्वजनिकरीत्या न साजरा करण्याचा निर्णय घेऊन त्यांनी एक वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांची कार्यकर्त्यांना कायम एकच सूचना असते - "जर वाढदिवस साजरा करायचाच असेल तर तो सामाजिक उपक्रमातून साजरा करा. गरीबांना मदत करा, रक्तदान शिबिर घ्या, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटा किंवा मुख्यमंत्री सहाय्यता निधीत योगदान द्या."

**कार्य हाच खरा उत्सव**

स्वतःच्या वाढदिवसावर होणारा खर्च वाचवून तो गरजूंसाठी वापरण्याची भूमिका ही केवळ साधेपणाची नाही, तर ती जबाबदार नेतृत्वाची निशाणी आहे. ज्या व्यक्तीने आपले संपूर्ण आयुष्य राष्ट्रभक्ती, सेवा आणि समर्पणाला वाहिले आहे, त्यांच्यासाठी व्यक्तिपूजा नव्हे तर कार्यपूजा हेच महत्वाचे आहे. आजच्या काळात जिथे नेते-कार्यकर्त्यांच्या वाढदिवसाला बॅनरबाजी, जाहिराती आणि शक्तिप्रदर्शनाचा बाजार मांडला जातो, तिथे देवाभाऊंनी "सेवा हाच धर्म" हा संदेश कृतीतून दिला आहे.

**चांदा ते बांदा नेतृत्वाचा प्रवास**

नागपूर महानगरपालिकेचे महापौर म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करून आमदार, प्रदेशाध्यक्ष, विरोधी पक्षनेता आणि आता सलग तिसऱ्यांदा मुख्यमंत्री... हा प्रवास सोपा नव्हता. संघटनात्मक कसब, अभ्यासू वृत्ती आणि निर्णयक्षमतेच्या बळावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली. राज्याच्या इतिहासात सर्वाधिक काळ मुख्यमंत्रीपद भूषवणाऱ्या नेत्यांमध्ये आज त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

ग्रामपंचायत पातळीपासून ते दिल्लीपर्यंत भाजपाचा झेंडा अधिक उंच नेण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्कार, शिस्तबद्ध जीवनशैली आणि अभ्यासू स्वभाव यामुळे त्यांच्या नेतृत्वाला एक वेगळी धार मिळाली आहे.

**नव महाराष्ट्राचे शिल्पकार - इन्फ्रामॅन**

महाराष्ट्राच्या विकासाचा नकाशा जर आज पाहिला तर तो देवाभाऊंच्या दूरदृष्टीशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गाने विदर्भ-मराठवाड्याला मुंबईशी जोडले. मुंबईतील अटल सेतूने प्रवासाचा वेळ निम्म्याने कमी केला. नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्ग, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचे सक्षमीकरण, मेट्रोचे जाळे... या सर्व प्रकल्पांमुळे राज्यातील दळणवळण क्रांती झाली. म्हणूनच त्यांना "इन्फ्रामॅन" ही पदवी जनतेने बहाल केली.

मराठवाडा, विदर्भ तसेच सर्व क्षेत्रांमध्ये निधी उपलब्ध करून देऊन सर्वांगीण विकास करण्याचा त्यांचा संकल्प आहे. टोयोटा सारख्या जागतिक कंपनीची गुंतवणूक, वाढवण बंदराचा विकास, औद्योगिक कॉरिडॉर यामुळे राज्यात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या. इन्फ्रास्ट्रक्चर वाढले की रोजगार वाढतात आणि त्यातूनच सामान्य माणसाच्या जीवनात सुबत्ता येते, हे त्यांचे सूत्र आहे.

**गरीब कल्याणाचा यज्ञ**

देवाभाऊंच्या राजकारणाचा केंद्रबिंदू आहे - "अंत्योदय". समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचला पाहिजे ही पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची शिकवण त्यांनी कृतीत आणली. शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक कर्जमाफी, 48 हजार कोटी रुपयांची थकित वीज बिल माफी, दिवसा 12 तास शेतीला वीज देण्यासाठी "मुख्यमंत्री सोलर कृषी वाहिनी", जलयुक्त शिवार 2.0, 100 रुपयात पांदण रस्ता आणि वारसा नोंदणी... या निर्णयांनी शेतकऱ्यांचे जीवन सुलभ झाले.

आरोग्यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी यातून लाखो रुग्णांना मदत मिळाली. महिलांच्या सक्षमीकरणासाठी "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" घराघरात पोहोचली. शिक्षण, कौशल्य विकास आणि स्टार्टअपला चालना देऊन तरुणांसाठी नवीन संधी निर्माण केल्या. निधी नाही म्हणून विकास थांबतो हा पूर्वीचा नियम त्यांनी मोडून दाखवला. आपल्या सहकाऱ्यांना श्रेय देण्याचा मोठेपणा त्यांच्यात आहे. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वाखालील मागणीला त्यांनी पूर्तता केली. पारदर्शक कारभार आणि भ्रष्टाचारमुक्त यंत्रणेमुळे प्रत्येक योजनेचा लाभ थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे.

**शिव्याप्रुफ धनी - सहनशीलतेचे प्रतीक**

राजकारणात टीका, टिप्पणी आणि शिव्या या अटळ असतात. त्यांना न घाबरता सातत्याने विकास हा केंद्रबिंदू म्हणून सर्वांना सोबत घेऊन महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. "तोंडात साखर, डोक्यात बर्फ आणि पायात चक्री" हा मंत्र जपणारे नेतृत्व म्हणजे देवाभाऊ. विधानसभेत विरोधकांच्या टीकेला त्यांनी संयमाने उत्तर दिले आणि स्वतःलाच "शिव्याप्रुफ" म्हणवून घेतले.

कितीही कठोर टीका झाली तरी ते संयम ढळू देत नाहीत. कामातूनच उत्तर देण्याची त्यांची पद्धत आहे. यामुळेच विरोधकांचाही आदर त्यांना मिळतो. संघाच्या संस्कारातून आलेली ही सहनशीलता आणि सकारात्मकता हेच त्यांच्या यशाचे गमक आहे.

**निष्कर्ष**

आज महाराष्ट्र ज्या वेगाने प्रगती करत आहे, त्यामागे देवाभाऊंची दूरदृष्टी, कष्ट आणि जनसेवेची भावना आहे. त्यांनी महाराष्ट्राला केवळ पायाभूत सुविधाच दिल्या नाहीत, तर एक आत्मविश्वास दिला - "महाराष्ट्र देशात नंबर 1 होऊ शकतो."

अकोला जिल्ह्यात आमदार रणधीर सावरकर यांच्या कल्पनेतून आपल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून अकोला जिल्ह्यातील 927 गावांमध्ये विविध कार्यक्रम राबवण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे. खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, संतोष शिवरकर, जयंत मसने, विजय अग्रवाल, महापौर शारदाताई खेडकर आणि सर्व मंडळ अध्यक्ष व आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून 4 दिवस 56 वेगवेगळे सेवा कार्यक्रम साजरे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

वाढदिवसानिमित्त देवाभाऊंना कोटी कोटी शुभेच्छा! ईश्वर त्यांना निरोगी दीर्घायुष्य देवो आणि महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी त्यांना अधिक बळ देवो.

समाजानेही त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत आजचा दिवस "सेवा दिन" म्हणून साजरा करावा. हिच खरी देवाभाऊंना वाढदिवसाची भेट असेल.

**जय हिंद! जय महाराष्ट्र!**

गिरीश जोशी,
अकोला जिल्हा भाजपा प्रवक्ता

# निलेश देव यांचे बेमुदत अन्नत्याग आंदोलन मागे

प्रतिनिधी २१ जुलै

## आयुक्त डॉ. सुनील लहाने यांचे सकारात्मक आश्वासन



**अकोला** : प्रभाग क्रमांक ३ आणि सन २०१६ मध्ये अकोला महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या हद्दवाढ भागातील नागरिकांच्या प्रलंबित नागरी सुविधांच्या प्रश्नांवर वंचित बहुजन आघाडीचे गटनेते तथा नगरसेवक निलेश देव यांनी सुरू केलेले बेमुदत अन्नत्याग आंदोलन सोमवार रात्री उशिरा मागे घेण्यात आले. मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी सर्व मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करून कालबद्ध पद्धतीने प्रश्न सोडविण्याची लेखी हमी दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

मनपा मुख्यालयासमोर सोमवारी सकाळी १० वाजता आंदोलनाला सुरुवात झाली होती. दिवसभरात विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रांतील मान्यवरांनी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा दर्शवला. सायंकाळी अतिरिक्त आयुक्त सुबोध अलोणे, अतिरिक्त आयुक्त गणेश शहाणे, झोन अधिकारी राजेश सराफ, दिलीप जाधव यांच्यासह प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. त्यानंतर आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या दालनात झालेल्या संयुक्त बैठकीत प्रत्येक मागणीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रशासकीय पातळीवर सर्व मागण्यांवर कालबद्ध अंमलबजावणीचे आश्वासन मिळाल्यानंतर निलेश देव यांनी आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले.

या आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पराग गवई, शेख शमशु शेख साबीर, बबलू पातोंडे, जिल्हाध्यक्ष प्रमोद देडवे, जि. प. माजी उपाध्यक्ष दामोदर जगताप, मनोहर बनसोड, गजानन गवई, शंकरराव इंगळे, राजेश मोरे, धीरज खंडारे, साजन अपगड, सुगंत तायडे, शोभाताई शेळके, ज्ञानेश्वर सुलताने, मनपा विरोधी पक्षनेते डॉ. जिशान हुसैन, शिवसेना गटनेते विजय इंगळे यांच्यासह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# भाजी बाजारात टमाटर, कोथिंबिर खात आहे भाव!

प्रतिनिधी २१ जुलै

## सर्वसामान्यांना महागाईचा फटका, भाजीपाल्याची आवक मंदावल्याचा परिणाम



अकोला : भाजीपाल्याचे भाव दिवसेंदिवस वाढत असल्याने सर्वसामान्यांना महागाईचा फटका सहन करावा लागला. कोणताही भाजीपाला २० ते ३० रूपये पावाच्या खाली नसल्याने नेमके घ्यावे काय, हा प्रश्न पडतो. लसून, कोथिंबीर यांचे भाव तर पावाला ६० रूपये म्हणजे २४० ते २५० रूपये किलोपर्यंत पोहाचले होते. गत आठवड्यात ८० रूपयांपर्यंत गेलेले टमाटर सध्या ६० रूपयावर आले आहेत. त्यामुळे भाजीपाला चांगलाच कडाडला अशा प्रतिक्रिया बाजाराले आलेले नागरिक देत होते. गत काही दिवसांपासून जिल्ह्यासह आजूबाजूच्या परिसरात नियमित पाऊस होत आहे. पावसामुळे भाजीपाल्याची आवक घटली असून, दर वाढले आहेत. तसेच भाजीपाला पिकाचे नुकसान झाले आहे त्यामुळे आवक मंदावली आहे. दुसरीकडे मागणी कायम असल्याने दर वाढले आहेत. याचा फटका ग्राहकांना बसत आहे. मात्र वांगे, पत्ताकोबी, काशिफळ, आलू यांचे दर मात्र कायम असून ३० ते ४० रुपये किलोने विक्री करण्यात येत आहे. परिस्थिती अशीच कायम राहिली तर आणखी दर वाढण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे.

### मुख्य जनता भाजीबाजारासह चौकाचौकात भरतो बाजार

» पूर्वी भाजी बाजार म्हटले की जनता बाजार अशी ओळख निर्माण झाली होती. आता काळानुरूप बदल होत असून जनता बाजारसह डाबकी रोडवरील शिवाजीनगर, सिंधी कॅम्प, कौलखेड चौक, गोरक्षण रोड, जठारपेठ या ठिकाणीही भाजी बाजार भरत आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी गावखेड्यातून आलेले शेतकरी माल घेऊन बसत असतात.

### लोणच्याच्या कैरीची धूम

सध्या बाजारात लोणच्याच्या कैरीला मोठ्या प्रमाणात मागणी असून, त्या दृष्टीने व्यापाऱ्यांनी या कैरीची आवकही वाढवली आहे. चौका-चौकात या कैऱ्यांची दुकाने थाटलेली दिसून येत आहे. यामध्ये गोरक्षण रोड, गांधी चौक, तुकाराम चौक, जठारपेठ, सिंधी कॅम्प तसेच मुख्य बाजाराचा समावेश आहे. विशेष म्हणजे हे विक्रेते कैरी फोडूनही देत असल्याने ग्राहकांची सोय झाली आहे. मात्र भाव १०० ते १५० रूपये किलो आणि फोडण्याची २० रूपये असल्याने अनेक ग्राहक दोन ते तीन किलो कैरी घेऊन आपली हौस व आवड जपत आहेत.

# हिवरखेड प्रभाग क्रमांक एक मध्ये अचानक भिंत कोसळली




प्रतिनिधी २१ जुलै

हिवरखेड: प्रभाग क्रमांक एक मधील रहिवाशी संदीप खिरोडकार यांच्या मालकीची जागेतील भिंत अचानक कोसळल्याने आचार्यांचा धक्का बसला, यामध्ये सुदैवाने जिवीतहानी टळली परंतु त्यांच्या वडिलांची मोटरसायकल त्या खाली दबली तसेच महावितरणचे विद्युत मीटर व गेट सुद्धा दबले होते, त्यामुळे मोटरसायकल व भिंतीचे अंदाजे एक ते दीड लाख रुपयापर्यंत नुकसान झाले असे समजते, पावसाचे पाणी या भिंती मध्ये शिरले असावे यामुळे ही भिंत कोसळली असावी असा सुद्धा अंदाज दर्शविला जात आहे, या दरम्यान या भागाचे तलाठी समीर खान यांनी पाहणी केली, नगरपरिषदच्या वतीने तत्काळ घरकुलाचा लाभ या लाभार्थ्याला द्यावा तसेच आपत्ती विभागाच्या वतीने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी या परिसरातील रहिवाशी करीत आहेत

# स्व. डॅडी देशमुख पुण्यतिथीनिमित्त आज प्रा.डॉ. किशोर फुले यांचे व्याख्यान

प्रतिनिधी २१ जुलै



**अकोला** : माजी नगराध्यक्ष प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या २१व्या पुण्यतिथीनिमित्त २१जुलैला दुपारी ४ वाजता श्री.शिवाजी महाविद्यालयाच्या वसंत सभागृहात प्रा.डॉ.किशोर फुले अमरावती यांचे 'प्रकृती!विकृती!!संस्कृती!!!'या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. डॅडींनी स्थापन केलेल्या ललित कला अकादमी तर्फे आयोजित "रंग भरो" स्पर्धेतील विजेत्या कलाकारांना पाहुण्यांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे
. अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर परीक्षेत अर्थशास्त्र या विषयात सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याचा डॅडीच्या नावाने सुवर्णपदक आणि रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बाबूजी देशमुख वाचनालयाचे अध्यक्ष महादेवराव भुईभार, श्री.शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट ,ललित कला अकादमीचे अध्यक्ष प्रा.सुरेश राऊत,सचिव श्री.अनुराग मिश्रा यांनी केले आहे.

# उरळ पोलिसांकडून 48 तासांत चोरीचा गुन्हा उघड!



प्रतिनिधी २१ जुलै

हातरूण : पोलीस स्टेशन उरळ येथे कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हाचा तपास पोलिसांनी गतीने चक्रे फिरवित ४८ तासांच्या आत लावण्यात आल्याने त्यांच्या कार्याविषयी समाधान होत आहे.

या गुन्ह्याचा तपास पोहेकॉ विजय चव्हाण व पोहेकॉ रघुनाथ नेमाडे हे करीत होते तपासी अमंलदार यांनी सदर तपासाची चक्रे वेगाने फिरवून गुन्ह्यातील चोरी गेलेला मुद्देमाल एक बैल जोडी किंमत अदांजे ८० हजार रूपये आरोपी संजय भिमराव अघडते रा. धामनगाव चोरे ता. आकोट याचे ताब्यातून हस्तगत करून गुन्हा उघडकीस आणला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी पडघन यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार जनार्धन खंडेराव, पोउपनि परमेश्वर केंद्रे, पोहवा विजय चव्हाण, पोहवा रघुनाथ नेमाडे यांनी केली आहे.

# हेल्मेट सक्ती पुन्हा सुरु

**अकोला:** अकोल्यात हेल्मेट सक्तीची मोहीम पुन्हा एकदा तीव्र झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या दुचाकीस्वारांची पोलिसांनी थांबवित हेल्मेट ची मागणी केली. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी ट्रॅफिक पोलीस आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत.

शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि रस्ते अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. याचाच एक भाग म्हणून आजपासून शासकीय कार्यालयांमध्ये हेल्मेट सक्तीची कडक अंमलबजावणी सुरू करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच ट्रॅफिक पोलिसांनी विशेष मोहीम राबवून विनाहेल्मेट येणाऱ्या दुचाकीस्वारांना अडवले. शासकीय कर्मचारी आणि नागरिकांना कार्यालयात प्रवेश करण्यापूर्वी हेल्मेट घालणे अनिवार्य करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक



कारवाई केली जात आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करणे आणि वाहनधारकांमध्ये शिस्त निर्माण करणे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. पोलिसांच्या या अचानक सुरू झालेल्या कारवाईमुळे विनाहेल्मेट फिरणाऱ्या दुचाकीस्वारांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

# विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात केंद्र सरकार अपयशी; राष्ट्रपतींकडे हस्तक्षेपाची मागणी

## जावेद जकरिया यांचे राष्ट्रपतींना ई-मेलद्वारे निवेदन

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) महाराष्ट्रचे प्रदेश संघटक सचिव जावेद झकरिया यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या २२ दिवसांपासून सुरू असलेल्या विद्यार्थी-युवा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या महामहिम राष्ट्रपतींना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.



जावेद झकरिया यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, देशभरातील विद्यार्थी आणि युवक विविध शैक्षणिक समस्या, परीक्षा व्यवस्थेतील कथित अनियमितता तसेच आपल्या न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण आंदोलन करत आहेत. आज संसदेचे अधिवेशन सुरू असताना आंदोलनकर्त्यांनी 'संसद चलो' मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, संसद परिसराकडे जाण्यापूर्वीच पोलिसांनी त्यांना रोखल्याने तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर झालेल्या धक्काबुक्की, लाठीमार आणि इतर घटनांमध्ये अनेक विद्यार्थी तसेच काही पोलीस कर्मचारीही जखमी झाले. ते म्हणाले की, हा संघर्ष कोणाच्याही हिताचा नाही. विद्यार्थी आणि पोलीस हे दोघेही देशाचे महत्त्वाचे घटक आहेत. आंदोलनाच्या सुरुवातीलाच केंद्र सरकारच्या जबाबदार प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांशी सकारात्मक आणि अर्थपूर्ण संवाद साधला असता, तर अशी परिस्थिती टाळता आली असती. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही वादाचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे संवाद आणि चर्चा होय. या संपूर्ण घटनाक्रमाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची, जखमी विद्यार्थी आणि पोलीस कर्मचाऱ्यांना तातडीने योग्य उपचार व मदत उपलब्ध करून देण्याची, केंद्र सरकारच्या संबंधित मंत्र्यांमध्ये आणि आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांमध्ये त्वरित संवाद घडवून आणण्याची तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक आणि वेळबद्ध निर्णय सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक हस्तक्षेप करण्याची मागणी जावेद जकारीया यांनी निवेदनातून केली आहे.

# मुर्तीजापुरात विद्यार्थ्यांचा जंतर-मंतर आंदोलनाला पाठिंबा; शेकडो विद्यार्थ्यांचा भव्य मोर्चा

प्रतिनिधी २१ जुलै




**मुर्तीजापूर** : दिल्लीतील जंतर-मंतर येथे विविध शैक्षणिक व विद्यार्थी प्रश्नांवर सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी मुर्तीजापूर शहरात शेकडो विद्यार्थ्यांनी भव्य मोर्चा काढत आपल्या मागण्यांचा जोरदार आवाज बुलंद केला. मोर्चामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत सरकारविरोधात घोषणाबाजी केली.

मोर्चाची सुरुवात शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. त्यानंतर विद्यार्थी, युवक आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी झाले. हातात फलक, बॅनर आणि विविध घोषणांनी परिसर दणाणून सोडत हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. दिल्लीच्या जंतर-मंतर येथे वैज्ञानिक सोनम वांगचुक, कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके, नेहा भोरा यांच्यासह अनेक विद्यार्थी, युवक व सामाजिक कार्यकर्ते विविध शैक्षणिक प्रश्न, परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी आणि विद्यार्थ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरोधात आंदोलन करत आहेत.

देशभरात वारंवार होत असलेल्या प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. मुर्तीजापूरातील विद्यार्थ्यांनीही या आंदोलनाला जाहीर पाठिंबा देत परीक्षा प्रणाली पारदर्शक करावी, प्रश्नपत्रिका फुटीच्या घटनांवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, दोषींना कठोर शिक्षा द्यावी तसेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करावी, अशा मागण्या केल्या. यासोबतच केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

# 243 ग्रा.पं च्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : राज्यातील बिगर व अंशतःअनुसूचित क्षेत्रातील २०२४-२५ मध्ये मुदत संपलेल्या व २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मित ग्रामपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणकीय प्रणालीद्वारे राबवायचा मतदार यादी चा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने बुधवार, १५ रोजी जाहीर केला. जिल्ह्यात डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत संपणाऱ्या २२३ व ४ मार्च २०२४ अखेर मुदत संपलेल्या २० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुक प्रक्रियेला यानिमित्ताने आता वेग आला असून राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी चा कार्यक्रमानुसार २४ जुलै रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध होईल.२९ जुलै पर्यंत हरकती प्राप्त होण्याचा कालावधी तर ४ ऑगस्ट २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. ग्रामपंचायत निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर वार्डातील आरक्षण निश्चिती विशेष ग्रामससभेत यापूर्वीच घेण्यात आली होती. तालुकानिहाय ग्रामपंचायतमध्ये तेल्हारा ३३, आकोट ३८, मूर्तिजापूर ३३, अकोला ३९, बाळापूर ३९, बार्शीटाकळी २९ पातूर २८ समावेश आहे.

# राष्ट्रीय बाल विज्ञान काँग्रेसद्वारे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीचा विकास होतो - डॉ.नितीन ओक



प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : विद्यार्थ्यांनी जर राष्ट्रीय बाल विज्ञान काँग्रेसच्या वैज्ञानिक प्रकल्पांमध्ये सहभाग घेतला तर त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन कुतुहल संस्कार केंद्र अकोलाचे डॉ. नितीन ओक यांनी केले. ते प्रभात किड्स स्कूलमध्ये आयोजित विद्यार्थी व पालकांसाठीच्या सेमीनारमध्ये बोलत होते.

राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद, नवी दिल्ली, कुतुहल संस्कार केन्द्र अकोला, जिज्ञासा ट्रस्ट ठाणे व प्रभात किड्स स्कूल, अकोला यांचे वतीने या प्रकल्पा विषयीचे सेमीनार आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना या वैज्ञानिक प्रकल्पांच्या स्पर्धेत सहभागी होऊन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वैज्ञानिक क्षमता दाखविण्याची संधी मिळत असल्याचेही डॉ. ओक पुढे म्हणालेत. त्यांनी पालकांना या प्रोजेक्ट विषयी सविस्तर माहिती दिली. त्यांच्या विविध प्रश्नांची उत्तरे दिलीत. या प्रकल्पाबाबत संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासनही दिले.

सुरूवातीला प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे यांनी डॉ. नितीन ओक यांचे स्वागत केले. प्राचार्य वृषाली वाघमारे, विज्ञान विभाग प्रमुख मीता इंगळे आणि विज्ञान विभागाच्या शिक्षकांची याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार विज्ञान विभागाच्या शिक्षीका पुनम दुबे यांनी मानले. याप्रसंगी विज्ञानप्रेमी विद्यार्थी आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# चोरीचे गुन्हयातील दोन आरोपीना स्थानिक गुन्हे शाखेने केली अटक

प्रतिनिधी २१ जुलै



**अकोला** : शहरातील विविध पोलीस स्टेशनला दाखल वायर चोरीच्या गुन्हयातचे स्थानिक गुन्हे शाखेने दोन आरोपीना १९ रोजी अटक केली. रामदासपेठ हद्दीतील दोन, सिटी कोतवाली पोलिस स्टेशन तसेच खदान हद्दीतील एक असे चार गुन्हे उघडकीस आणले.

फिर्यादी मोहमद अख्तर मोहमद अफसर रा. हरीहरपेठ जुने शहर अकोला यांनी ०७/०७/२०२६ रोजी पो स्टे सिटी कोतवाली येथे वायर चोरी बाबत फिर्याद दिली. गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करीत असतांना माहीती प्राप्त झाली की, सदर गुन्हा आरोपी अदनान रा. शिवणी व शेख रेहान रा. सिंधी कँप, अकोला यांनी केला आहे. दोन्ही संशयितांना ताब्यात गुन्हयाबाबत चौकशी केली. आरोपीनी रामदासपेठ हद्दीतील बिर्ला गेट २ जवळ, सिन्हा यांचे हॉस्पीटल अकोला येथुन वायरचे सात ते ८ बंडल व मोहता मिल रोड, अकोला येथुन ए.सी. मोबाईल टॉवरची तांबा धातुची केबल तसेच पो स्टे खदान हद्दीतील खदान नाका परीसरातुन १२ किलो वायर असे एकण चार गुन्हयात जवळपास १,२०,०००/-रू.ची वायर चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाले. एकुण चार गुन्हे उघडकीस आले आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधिक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा अकोला चे प्रमुख नितीन लेव्हरकर, सपोनि गोपाल जाधव, पोलीस अमलदार उमेश पराये, सुलतान पठाण, वसीमोद्दीन, अमित दुबे, पवन डांबलकर, सतिष पवार, करण मानकर, सुनिल काळे, राज चंदेल यांनी केली.

**CHANGE IN NAME**

Name - **Mohd Shahed Abdul Zaher**

New name - **Mohammad Shahed Abdul Zaher**

**Adress - 114 masjid kadiv parisar Mominpura Near Jama masjid Murtizapur tq Murtizapur dist Akola 444107**

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
मंगळवार, दि. २१ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# रुग्णसेवेत टाळाटाळ करणाऱ्यांवर कारवाई करा : आ. किसन वानखेडे

**आरोग्य सेवेतील त्रुटींवर आढावा बैठकीत ताशेरे : रिक्त पदे, अपुरी सुविधा आणि समन्वयाचा अभाव**

प्रतिनिधी २१ जुलै

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासाठी रुग्णसेवेत टाळाटाळ करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश आमदार किसन वानखेडे यांनी दिले. नगर परिषदेच्या संभाजी उद्यान सभागृहात सोमवारी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

बैठकीत तालुक्यातील आरोग्य यंत्रणेतील अनेक गंभीर बाबी समोर आल्या. अपघातग्रस्तांसाठी तीन रुग्णवाहिकांची गरज असताना केवळ ढाणकी येथे एकच रुग्णवाहिका उपलब्ध असल्याचे स्पष्ट झाले. तसेच १४ मुख्यालयीन वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असताना केवळ आठ अधिकारी कार्यरत आहेत. कायमस्वरूपी ५३ परिचारिकांच्या जागांपैकी फक्त १३, तर ३६ कंत्राटी परिचारिकांपैकी केवळ १५ कार्यरत आहेत. पुरुष परिचारकांच्या २६ मंजूर



■ उपजिल्हा रुग्णालय सुरू होऊन सहा वर्षे झाली असली तरी आरोग्य सेवेतील कार्यपद्धतीत अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याचे बैठकीत निदर्शनास आले. रुग्णालय अधीक्षक आणि कर्मचाऱ्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे रुग्णांना दर्जेदार उपचार मिळत नसून अनेकांना नांदेड किंवा यवतमाळ येथे उपचारासाठी जावे लागत असल्याचे रुग्ण सेवा कल्याण समितीचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर व्यवहारे यांनी सांगितले.

पदांपैकी फक्त आठ कर्मचारी कार्यरत असल्याची माहिती प्रभारी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील दुबे यांनी दिली.

आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत सुमारे ९५ हजार रुग्णांना सेवा देण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. मात्र, तालुक्यात अद्याप ब्लड बँक व अतिदक्षता विभाग कार्यान्वित नसल्याची गंभीर बाबही समोर आली.

आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता, शिस्त आणि रुग्णांप्रती सेवाभाव आवश्यक असल्याचे सांगत आमदार वानखेडे यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नकारात्मक दृष्टिकोन बदलून लोकाभिमुख सेवा द्यावी, असे आवाहन केले. बैठकीला अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

या बैठकीला जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, तहसीलदार राजेश सुरडकर, उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ. किशोर कपाळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील दुबे, डॉ. ज्ञानेश्वर व्यवहारे, प्रकाश दुधेवार आदी उपस्थित होते.

# दोन शिक्षकांवर 54 विद्यार्थ्यांचा भार; मारेगाव पंचायत समितीत भरली शाळा

प्रतिनिधी २१ जुलै

**यवतमाळ :** मारेगाव तालुक्यातील जळका येथील वरिष्ठ उच्च प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या कमतरतेविरोधात विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी सोमवारी पंचायत समितीच्या प्रांगणातच विद्यार्थ्यांचा वर्ग भरवत अनोखे आंदोलन केले. "शिक्षक द्या, शिक्षण वाचवा" अशी घोषणा देत शाळेसाठी अतिरिक्त शिक्षकांची तातडीने नियुक्ती करण्याची मागणी करण्यात आली.

जळका येथील शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत ५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मात्र, संपूर्ण शाळेसाठी केवळ दोन शिक्षक कार्यरत आहेत. त्यापैकी मुख्याध्यापकांकडे



प्रशासकीय व ऑनलाइन कामांचा भार असून दुसऱ्या शिक्षकाकडे बीएलओची जबाबदारी असल्याने नियमित अध्यापनावर परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार किमान चार शिक्षकांची आवश्यकता असताना दोनच शिक्षकांवर शाळेची जबाबदारी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची खंत पालकांनी व्यक्त केली. ग्रामीण भागातील अनेक पालकांची आर्थिक परिस्थिती खासगी शाळेत प्रवेश देण्याइतकी सक्षम नसल्याने सरकारी शाळेतील शिक्षणव्यवस्था सक्षम करणे आवश्यक असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पंचायत समितीच्या आवारात विद्यार्थ्यांना बसवून प्रतीकात्मक वर्ग घेण्यात आला. शिक्षणाच्या हक्कासाठी विद्यार्थ्यांनीही आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्याने परिसरात या आंदोलनाची विशेष चर्चा होती.

या आंदोलनात सरपंच सौ. जोशना कुमरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोज वडाई, प्रतिभा ढाले, लोचना सोलंकी, ताई सोयाम, सुषमा कुमरे, विशाल पेंदोर यांच्यासह ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला.

# साईश्रद्धा नगरात पुन्हा घरफोडी

प्रतिनिधी २१ जुलै

**उमरखेड :** शहरातील साईश्रद्धा नगर परिसरात घरफोड्यांच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसून रविवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी बंद घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. परिसरात सातत्याने होत असलेल्या घरफोड्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी होत आहे.

याप्रकरणी रमेश दत्तराव आकोसकर (रा. साईश्रद्धा नगर) यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीनुसार, आकोसकर हे कुटुंबासह मुळावा येथे गेले असताना त्यांच्या मोठ्या भावाने घराचे कुलूप तुटल्याची माहिती दिली. त्यानंतर घरी परतल्यावर मुख्य दरवाजाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केल्याचे दिसून आले.



चोरट्यांनी घरातील लोखंडी कपाटाचे लॉकर फोडून दोन सोन्याच्या अंगठ्या, एक सोन्याची बाळी, सुमारे १० तोळे चांदीचे दागिने तसेच १६ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

या प्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. परिसरात वाढत्या घरफोड्यांमुळे नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# चिमुरडीवरील अत्याचार-हत्येच्या निषेधार्थ मोर्चा

प्रतिनिधी २१ जुलै

**महागाव :** महागाव तालुक्यातील नगरवाडी येथील १२ वर्षीय आदिवासी मुलीवर वर्धा जिल्ह्यातील सावंगी (रोठा) येथे कथित सामूहिक लैंगिक अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ आदिवासी कृती समितीने सोमवारी महागाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन देत आरोपींना कठोर शिक्षा, तसेच प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणी करण्याची मागणी करण्यात आली.

नगरवाडी येथील मजूर कुटुंबातील ही १२ वर्षीय मुलगी आई-वडिलांसह वर्धा जिल्ह्यातील रोठा परिसरात वास्तव्यास होती. १५ जुलै रोजी ती घरी एकटी असताना अज्ञात व्यक्तींनी तिच्यावर कथित सामूहिक लैंगिक अत्याचार करून दगडाने



ठेचून हत्या केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि पॉक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून काही संशयितांना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेच्या निषेधार्थ आदिवासी कृती समितीच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी महागाव तहसील कार्यालयावर मोर्चा काढून आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. तसेच गुन्ह्यातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून दोषारोपपत्र लवकर न्यायालयात दाखल करावे, वरिष्ठ विशेष सरकारी वकील नियुक्त करावा आणि प्रकरणाची दैनंदिन सुनावणी फास्ट ट्रॅक न्यायालयात व्हावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पीडित कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत, मोफत कायदेशीर सहाय्य, पुनर्वसन आणि कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी देण्याची मागणीही समितीने केली आहे. मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष न दिल्यास व्यापक आंदोलन छेडण्याचा इशारा समितीने दिला. मोर्चात माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास मोहकर, माजी पंचायत समिती सभापती नागोराव ढोले, बाजार समिती संचालक पुंडलिक भुरके, निवृत्त नायब तहसीलदार उत्तमराव पांडे, विठ्ठल घावस, तुकाराम मिसे, नारायण गव्हाळे, गणपत गव्हाळे, दत्तात्रय खंदारे, प्रकाश ढगे, देविदास डाखोरे यांच्यासह मोठ्या संख्येने आदिवासी समाजबांधव सहभागी झाले.

# लोकअदालतीत १२१ प्रकरणांचा निपटारा; २.२९ कोटींचे दावे मार्गी

प्रतिनिधी २१ जुलै

**यवतमाळ :** जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या विशेष लोकअदालतीत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) संदर्भातील १२१ प्रलंबित प्रकरणांचा आपसी तडजोडीने निपटारा करण्यात आला. या प्रकरणांमधील तडजोडीचे एकूण मूल्य २ कोटी २९ लाख १९ हजार २३३ रुपये इतके आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार १८ जुलै रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष आनंद एल. यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी वकील आणि बँक अधिकाऱ्यांसोबत पूर्वनियोजित बैठका घेण्यात आल्या. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायाधीशांशी आभासी माध्यमातून संवाद साधून नियोजन करण्यात आले. लोकअदालतीच्या माध्यमातून वाद सामंजस्याने आणि अंतिम स्वरूपात मिटविता येतात, याबाबत पक्षकारांमध्ये विश्वास निर्माण झाल्याने मोठ्या संख्येने प्रकरणे तडजोडीने निकाली निघाली.

या प्रक्रियेमुळे संबंधित पक्षकारांचा वेळ, श्रम आणि खर्चाची बचत होऊन न्यायदानाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान झाल्याचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने नमूद केले आहे.

विशेष लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा व तालुका न्यायालयातील न्यायाधीश, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सहकार्य करणाऱ्या सर्वांचे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव दिपक दाभाडे यांनी आभार मानले.

# यवतमाळ–मूर्तिजापूर 'शकुंतला' रेल्वे पुन्हा सुरु करा

**बसपाची मागणी, जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

प्रतिनिधी २१ जुलै

**यवतमाळ :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या यवतमाळ–मूर्तिजापूर 'शकुंतला' रेल्वेचे ब्रॉड गेजमध्ये रूपांतर करून सेवा तातडीने पुन्हा सुरू करावी, अशी मागणी बहुजन समाज पार्टीने केंद्र सरकारकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान आणि केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना पाठविण्यात आले.

बसपाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, 'शकुंतला' रेल्वे ही केवळ वाहतुकीचे साधन नव्हे, तर यवतमाळ जिल्ह्याच्या इतिहासाचा आणि अस्मितेचा भाग आहे. अनेक दशकांपासून शेतकरी, व्यापारी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी ही रेल्वे महत्त्वाची जीवनवाहिनी होती. सेवा बंद झाल्यानंतर जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासावर परिणाम झाला असून, नागरिकांना प्रवासासाठी पर्यायी साधनांवर अवलंबून राहावे लागत आहे.

या रेल्वेमार्गाची जागा आजही भारतीय रेल्वेच्या मालकीची असल्याने नवीन जमीन संपादनाची गरज नाही. त्यामुळे ब्रॉड गेज प्रकल्पाची अंमलबजावणी तुलनेने सुलभ होऊ शकते, असा दावा बसपाने केला आहे. रेल्वे पुन्हा सुरू झाल्यास कृषीमालाची वाहतूक वेगवान होईल, उद्योग-व्यवसायांना चालना मिळेल, रोजगाराच्या संधी वाढतील आणि नागरिकांना सुरक्षित, स्वस्त व सोयीस्कर प्रवासाची सुविधा



उपलब्ध होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यावेळी जिल्हाध्यक्ष संदेश ढोले, माजी जिल्हाध्यक्ष गुणवंत गणवीर, लोकसभा प्रभारी पंडित दिघाडे, प्रकाश राऊत, ॲड. सुनील घोडेस्वार, उपाध्यक्ष विपुल खोब्रागडे, महासचिव हर्षवर्धन ठमके, कोषाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शंकर धनकुलवार, शहराध्यक्ष ॲड. दीक्षांत भगत, विधानसभा अध्यक्ष सुनील वाघमारे, गिरधारी भगत, दिलीप गणवीर, हेमंत सुखदेवे, मधुकर सावळे, संजय मानकर आणि धनराज धवने उपस्थित होते.

# दिग्रस महावितरण 'अधिकारीविना'; रिक्त पदांचा वीज ग्राहकांना फटका

प्रतिनिधी २१ जुलै

**दिग्रस :** महावितरणच्या दिग्रस विभागीय कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची अनुपस्थिती आणि शहर अभियंत्याचे (अर्बन) रिक्त पद यामुळे वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण खोळंबल्याचे चित्र आहे. पावसाळ्यात वाढलेल्या तांत्रिक अडचणींच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असून, जबाबदार अधिकारी उपलब्ध नसल्याने नाराजीचा सूर तीव्र झाला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, उपकार्यकारी अभियंता नियमितपणे कार्यालयात उपलब्ध नसतात. याशिवाय शहर अभियंत्याचे पदही दीर्घकाळापासून रिक्त आहे. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होणे, तुटलेल्या वीजवाहिन्या, ट्रान्सफॉर्मरमधील बिघाड, नवीन वीजजोडणी, कमी-जास्त दाबाचा पुरवठा तसेच इतर तांत्रिक तक्रारींच्या निवारणात विलंब होत आहे.

पावसाळ्यात वीज यंत्रणेवर अतिरिक्त ताण येत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अभाव अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अनेकदा दूरध्वनीवर संपर्क होत नसल्याने अथवा निर्णय घेण्याचा अधिकार असलेला अधिकारी उपलब्ध नसल्याने तक्रारी प्रलंबित राहत असल्याचीही तक्रार आहे.

दिग्रस शहर आणि तालुक्यातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच उद्योग, व्यापारी आस्थापने आणि शेतीसाठी अखंडित वीजपुरवठा अत्यावश्यक बनला आहे. मात्र रिक्त पदांमुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी पडत असून, त्याचा परिणाम सेवा वितरणावर होत असल्याचे बोलले जात आहे.

महावितरण ही अत्यावश्यक सेवा असल्याने दिग्रस कार्यालयात नियमित उपकार्यकारी अभियंता आणि शहर अभियंता यांची तातडीने नियुक्ती करून ग्राहकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करावे, अशी मागणी नागरिक, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेऊन कार्यालयातील रिक्त पदे त्वरित भरावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# नेर तालुक्यात बोगस बियाण्यांचा कहर, शेतकरी हतबल

प्रतिनिधी २१ जुलै

**नेर :** निकृष्ट व बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर दोषी कंपन्या, उत्पादक, वितरक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात नेर तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

पेरणीचा हंगाम संपल्यानंतर बियाणे बदलून देणे किंवा तुटपुंजी भरपाई देणे हा या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय नाही. बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांवर किरकोळ कारवाई न करता फौजदारी गुन्हे दाखल करून मोठा आर्थिक दंड, परवाना रद्द करण्यासह कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. भविष्यात कोणत्याही कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचे धाडस करू नये, यासाठी कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा संघटनेने व्यक्त केली. यावेळी प्रहारचे अध्यक्ष गौरव नाईकर, दिव्यांग क्रांती संघटनेचे पिंटू ढबाले, योगेश ढवळे, सतीश काळे, पंकज खानझोडे, योगेश आडे, राजेश इंगोले, दर्शन पंडित, सतीश गव्हाणे, अरुण कोल्हे, अतुल काळे, मुकिंदा तलवारे, शरद ठाकरे, अक्षय ढबाले, अमोल धार्मिक आदी उपस्थित होते. नेर तालुक्यात बोगस बियाण्यांचा कहर झाला आहे.


# दिग्रस अंधारात; निम्म्याहून अधिक स्ट्रीट लाईट बंद

**ऐन पावसाळ्यात नागरिकांची गैरसोय; प्रशासन, ठेकेदार व महावितरणच्या समन्वयाचा अभाव**

प्रतिनिधी २१ जुलै

**दिग्रस :** दिग्रस शहरातील निम्म्याहून अधिक रस्त्यांवरील स्ट्रीट लाईट अनेक दिवसांपासून बंद असल्याने ऐन पावसाळ्यात नागरिकांना अंधारातून जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मुख्य रस्ते, चौक आणि अनेक गल्लीबोळ अंधारात बुडाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत असून, नगर परिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

पावसाळ्यामुळे रस्त्यांवर पाणी साचणे, खड्डे, मोकाट जनावरे तसेच साप-विंचूंचा धोका वाढला आहे.



अशा परिस्थितीत स्ट्रीट लाईट बंद असल्याने महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि रात्री कामावरून घरी परतणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

शहरातील स्ट्रीट लाईट देखभालीची जबाबदारी असलेल्या ठेकेदाराकडे अनेक नगरसेवकांनी वारंवार तक्रारी करूनही त्याची दखल घेतली जात नसल्याची चर्चा आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधीही हतबल झाल्याचे चित्र असून, प्रशासन आणि ठेकेदार यांच्यातील समन्वयाचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे.

अनेक ठिकाणी वीजवाहिन्या तुटलेल्या अवस्थेत असून, त्याबाबत नगर परिषदेकडून महावितरणला वारंवार पत्रव्यवहार करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. मात्र, आवश्यक दुरुस्ती वेळेत होत नसल्याने शहरातील अंधार कायम आहे.

कराच्या स्वरूपात लाखो रुपयांचा महसूल भरूनही नागरिकांना सुरक्षित आणि प्रकाशमान रस्त्यांसारखी मूलभूत सुविधा मिळत नसल्याची खंत शहरवासीय व्यक्त करत आहेत. प्रशासनाने तातडीने दुरुस्ती मोहीम हाती घेऊन सर्व बंद स्ट्रीट लाईट सुरू करावेत, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, राज्याचे मंत्री संजय राठोड आणि यवतमाळ-वाशीमचे खासदार संजय देशमुख यांनी या प्रश्नात लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन शहरातील स्ट्रीट लाईट व्यवस्था सुरळीत करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा प्रश्न अधिक काळ प्रलंबित न ठेवता तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. अन्यथा एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रशासन जागे होण्याची वेळ येऊ नये, अशी भावना शहरवासीयांनी व्यक्त केली आहे.

# शनिवारी नगर प्रदक्षिणा पालखी सोहळा

प्रतिनिधी २१ जुलै

**दारव्हा :** येथील संत मुंगसाजी महाराज जुने मंदिरच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त शनिवारी (२५ जुलै) सकाळी ८:३० वाजता नगर प्रदक्षिणा पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात पालखी येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर (गणपती मंदिराजवळ) येथून प्रमुख मार्गाने नगर प्रदक्षिणा करीत मुंगसाजी महाराज जुने मंदिर येथे आगमन होईल. मंदिरात पालखीचे स्वागत आणि महाआरतीनंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या भक्तिमय सोहळ्यात परिसरातील भजनी मंडळ, महिला भजनी मंडळ, वारकरी संप्रदायातील माऊली भक्त आणि भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**नावात बदल**

**नाव दुरुस्ती** लिविंग सर्टिफिकेटवर जुने नाव :
मो नईमऊल्लाह मो जफरऊल्लाह
आधार कार्ड वर जुने नाव : मो नईम मो जफरउल्लाह
**नवीन नाव : नईम शेख**
**पत्ता** : पांढरकवडा रोड, मस्जिद के पीछे,
ज़फर नगर, जि. यवतमाळ-445001
मोबाइल नं: 9021807222

# ग्रामीण पोलिसांची व्यापक जनजागृती मोहीम अंमली पदार्थमुक्त समाज

## हेल्मेट वापर व सायबर सुरक्षेबाबत प्रभात फेरीद्वारे जनजागृती

प्रतिनिधी २१ जुलै




**अमरावती:** अमरावती ग्रामीण पोलीसदलाच्यावतीनेराबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन कवच' या विशेष मोहिमे अंतर्गत १८ जुलै २०२६ रोजी सकाळी ०८.०० ते १०.३० वा. दरम्यान जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन हद्दींमध्ये व्यापक जनजागृतीपर प्रभात फेरीचे आयोजन करुन सर्व सामान्य नागरीक, विदयार्थी यांना आव्हानकरण्यातआलेकी,पोलीस दलाचे वतीने अमली पदार्थ विरोधी जनजागृती मध्ये सहभागी होवून स्वताचेकुटूंबाचे,समाजाचेवदेशाचे व्यसनापासुन रक्षण करावे. आपले आजुबाजूला कोणी अवैदयरित्या अमली पदार्थ विकत असल्यास किंवा दिसून आल्यास तात्काळ पोलीसांना कळवावे. "कारण क्षणीक सुखाच्या नादात आयुष्य नका गमवू, अमली पदार्थाला दुर ठेवून सुंदर भविष्य घडवू" तसेच याच उपक्रमा अंतर्गत सर्वांना आव्हाहन करण्यात येते की, मागील काही दिवसांमध्ये घडलेले दुचाकी प्रानांतीक अपघात याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दुचाकी स्वार यांनी स्वताच्यातसेचकुटूंबाच्याजिवाची काळजी घेतली नाही. त्यामुळे कुटूंबाची मोठ्या प्रमाणात हानी झाली.तरीसर्वनागरीकांनाआव्हान करण्यात येते की, त्यांनी दुचाकी वरुनप्रवासकरतांनीआयएसआय मार्क हेल्मेटचा वापर करावा. या ऑपरेशन कवचला जिल्हा भरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून या मध्ये सर्वांनी सहभागी होवून एकप्रकारे देशातील तरुणांचे रक्षण करावे अशा आव्हानासह जिल्हयातील. आमदार प्रताप अडसड, आमदार प्रविण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार गजानन लवटे यांच्यासोबतच जिल्हाभरातून नशामुक्ति आंदोलनामध्ये मोठ्या प्रमाणात महाविदयालयीन शिक्षक वर्ग, विदयार्थी यांनी सहभागनोंदवूनव्यसनमुक्तसमाज बनविण्याचा संकल्प घेतला. यावेळीपोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी एकलव्य गुरुकुल नांदगाव खंडेश्वर येथे महाविदयालयीन शिक्षक, विदयार्थी यांच्यासोबत प्रभातफेरीमध्ये सहभाग नोंदवून विदयार्थांना नशामुक्त समाज बनविण्यासचे आव्हाहन केले. विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षेसाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व, आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२, ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या तक्रारींसाठी सायबरहेल्पलाइन१९३०,महिलाव बालकांच्यासुरक्षेसाठीहेल्पलाइन १०९१ तसेच अग्निशमन सेवेसाठी १०१ या क्रमांकांचा प्रभावी वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# 'शिक्षकच बनेल शिक्षक आमदार, डॉ.संगीता शिंदे खऱ्या हकदार'

## पाचही जिल्ह्यांतून आलेल्या हजारो शिक्षकांचा एकमुखी निर्धार

प्रतिनिधी २१ जुलै



**अमरावती:** पश्चिम विदर्भातील शिक्षक नेत्या, शिक्षण संघर्ष संघटनेच्या संस्थापक अध्यक्ष तथा आदर्श शिक्षिका म्हणून संपूर्ण विदर्भात लौकिक मिळवलेल्या डॉ. संगीता सचिंद्र शिंदे - बोंडे याच आगामी काळात शिक्षक आमदार बनतील आणि त्या या पदासाठी खऱ्या हकदार असल्याचा एकमुखी निर्धार पाचही जिल्ह्यांतून आलेल्या हजारो शिक्षक बंधू-भगिनींनी केला आहे.

शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत प्रश्न आणि शिक्षकांच्या सर्वांगीण हक्कांसाठी डॉ. संगीता शिंदे - बोंडे सातत्याने लढा देत असतात. कधी शासन दरबारी तर कधी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून शिक्षकांसाठी संघर्ष करणाऱ्या नेत्या म्हणून त्यांचे कार्य मोठे आहे. याच पार्श्वभूमीवर रविवारी (ता.१९) अमरावती येथे शिक्षण संघर्ष संघटनेची अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा या पाचही जिल्ह्यांतील पदाधिकारी व हजारो शिक्षक उपस्थित होते. या महत्त्वपूर्ण बैठकीला माजी सभापती विक्रम ठाकरे, महामंत्री नितीन गुडधे पाटील, शिक्षण संघर्ष संघटनेचे विभागीय अध्यक्ष अशोक भराड, कार्याध्यक्ष शरद तिरमारे, पद्माकर घोगरे, अॅड. अमोल ठाकरे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख, रोहिणी गजभिये, अशोक पोले प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच संघटनात्मक पातळीवर बुलढाण्याचे जिल्हाध्यक्ष विजय दाने, अविनाश पाटील, वाशिमचे प्रा. प्रशांत कंवर, अकोल्याचे प्रकाश हरदे, यवतमाळचे अविनाश रोकडे, अमरावतीचे अरविंद अपाले, यवतमाळ महिला जिल्हाध्यक्ष शुभांगी आवारी, कृपा पटेल, पूनम मोहोळ यांच्यासह विदर्भातील हजारो शिक्षक प्रतिनिधींनी उपस्थित राहून डॉ. संगीता शिंदे यांच्या उमेदवारीला जाहीर पाठिंबा दर्शवला.

**'शिक्षकांचे नेतृत्व शिक्षकच करेल'**

या बैठकीत अमरावती विभागीय शिक्षक मतदारसंघाचा आमदार कसा असावा, यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिक्षकांचे नेतृत्व करणारी व्यक्ती ही स्वतः शिक्षकच असली पाहिजे, या मुद्द्यावर सर्वांचे एकमत झाले. डॉ. संगीता शिंदे यांनी शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडवण्यासाठी आजवर केलेले कार्य पाहता, त्या या जागेसाठी सर्वात योग्य उमेदवार असल्याचा सूर शिक्षकांमधून उमटला.

# दुहेरी खुनाच्या गुन्हयातील 5 मुख्य आरोपींना घेतले ताब्यात

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी २१ जुलै




**अमरावती:** पोलीस स्टेशन वलगाव येथे दाखल दुहेरी खुनाच्या गुन्हयातील ५ मुख्य आरोपींना पाठलाग करून शिताफीने ताब्यात घेतले आहे.

अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई केली आहे. दिनांक २०/०७/२०२६ रोजी पोलीस स्टेशन वलगाव येथे फिर्यादी लिलाबाई अनिल तसरे, वय ६० वर्ष, रा. समता नगर, वलगाव यांनी तक्रार दिली की, त्यांचा नातु संजोग विकास जोशी वय १९ वर्ष रा. समता नगर वलगाव व त्याचा मित्र रूतीक पंडीत रा. महाजनपूरा, अमरावती हे त्यांच्या घरी असताना सायंकाळी ६ वा दरम्यान वलगाव येथे राहणारे गोलु उगले, मिलींद तायडे, सुमित सुरजुसे, अजय नागदिवे हे त्यांचे घरी आले व त्यांनी त्यांचा नातु संजोग जोशी याला आवज दिला व तो संजोग जोशी व रूतिक पंडीत यांना सोबत घेवुन जात असतांना त्यांनी त्यांना हटकले, असता गोलु उगले याने म्हटले कि, मी लवकरच त्यांना परत आणतो असे म्हणुन घेवुन गेला. त्यानंतर रात्री ११.३० वा दरम्यान मला घरा शेजारी राहणा-या इंदुबाई पंडीत व सुनिता बाई पंडीत यांनी आवज देवुन सांगीतले की, फिर्यादी यांचा नातु संजोग जोशी व मित्र रूतीक पंडीत यांना चाकुने मारले आहे व उपचारा करीता ईर्वीन दवाखाना येथे घेवुन गेले असता तेथील डॉक्टरांनी ते दोघेही मयत झाल्याचे सांगीतले. त्यानंतर नातु संजोग जोशी त्याचा मित्र आदेश बाळु उगले याने फिर्यादींना सांगीतले कि, तो दिनांक १९.०७.२०२६ रोजी रात्री १०.३० वा दरम्यान पान खाण्याकरीता जुना बसस्टॉप वलगाव येथील पानटपरी वर गेला असता रोडच्यापलीकडील बिकानेर दुकानाच्या बाजुने ओरडण्याचा आवाज आला तेव्हा तेथे जावुण पाहले असता संजोग जोशी याला गोलु उगले व रूतीक पंडीत याला मिलन तायडे हे चाकुने मारतांना दिसले तसेच सुमित सुरजुसे, अजय नागदिवे यांनी सुध्दा संजोग जोशी व रूतीक पंडीत यांना चाकुने वार करून जखमी केले व ओरडत असल्याने चाकु मारणारे तेथुन पळून गेले. काही दिवसांपुर्वी सुधिर पांडुरंग उगले, चंदु जानरावजी उगले यांचे सोबत संजोग जोशी व रूतीक पंडीत यांचा आपसात वाद झाला होता त्या कारणावरूण माझा नातु संजोग व त्याचा मित्र रूतीक यांना गोलु उगले, मिलन तायडे, सुमित सुरजुसे, अजय नागदिवे सर्व रा. वलगाव यांनी माझा नातु संजोग जोशी व रूतीक पंडीत यांना जिवाने ठार मारले. अशा फिर्यादीचे जबानी रिपार्ट वरून पोलीस स्टेशन वलगाव येथे ३१६/२०२६ कलम १०३ (१), ४९, ३(५) भा. न्या. सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अमरावती जिल्हा युवक काँग्रेस आक्रमक: बोगस बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल करा, जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा!

प्रतिनिधी २१ जुलै



**अमरावती :** अमरावती जिल्ह्यात शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या आणि त्यांच्या तोंडचा घास हिरावून घेणाऱ्या बोगस बियाणे विक्रेत्या कंपन्यांच्या विरोधात आता संतप्त वातावरण निर्माण झाले आहे. याचाच एक भाग म्हणून आज अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे अत्यंत आक्रमक निदर्शने करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्या या कंपन्यांवर तात्काळ कठोर कायदेशीर गुन्हे दाखल करावेत, या मुख्य मागणीसाठी हे आंदोलन छेडण्यात आले होते. आंदोलनादरम्यान युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या आणि बोगस बियाणे कंपन्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. दरवर्षी खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी वर्ग महागड्या बियाण्यांची खरेदी करतो, परंतु अनेकदा बियाणे बोगस निघाल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होते आणि दुबार पेरणीचे संकट ओढवते. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हे आक्रमक पाऊल उचलण्यात आले असून, दोषी कंपन्यांना पाठीशी घालणाऱ्या यंत्रणेचा तीव्र निषेध करण्यात आला.

# पोलीस आयुक्तांनी घेतली गुन्हेगारांची पेशी

## शहरात वाढत्या गुन्हेगारीवर पोलीस आयुक्त अॅक्शन मोडवर



प्रतिनिधी २१ जुलै

**अमरावती :** शहरात खुनाच्या घटना व इतर गुन्हे वाढल्याने शहरात कायदा व सुव्यवस्था राहावी यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी राजापेठ ठाण्यात 20 ते 25 पोलिसांचे रेकॉर्डर असलेले गुन्हेगार यांना बोलवून त्यांची पेशी घेतली.

शहरात कुठलाही गुन्हा कराल कर खबरदार? गाठ माझ्याशी आहे. अशी तंबी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी गुन्हेगारांना दिली. यावेळेस डीसीपी यशवंत सोळंके, काही वरिष्ठ पोलीस अधिकारी व राजापेठ चे ठाणेदार संदीप चव्हाण यांची उपस्थिती होती.

# जिल्ह्यातील विशेष लोक अदालतीमध्ये विविध प्रकरणांचा यशस्वी निपटारा

## 4.13 कोटी रुपयांची तडजोड

प्रतिनिधी २१ जुलै

**अमरावती :** जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे नुकतेच विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीमध्ये प्रामुख्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट अॅक्टच्या कलम 138 अंतर्गत येणाऱ्या 'धनादेश बाऊन्स' प्रकरणांवर तडजोडीसाठी भर देण्यात आला होता. संपूर्ण जिल्ह्यातून या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेष लोक अदालत पार पाडण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकूण 18 पॅनल (मंडळ) तयार करण्यात आले होते. या पॅनलमध्ये न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या लोक अदालतीसमोर एकूण 2 हजार 740 प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी 229 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये विशेष बाब म्हणजे 10 वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या 4 जुन्या प्रकरणांमध्येही दोन्ही पक्षांत तडजोड घडवून आणण्यात यश आले. या संपूर्ण प्रक्रियेतून एकूण 4 कोटी 13 लाख 45 हजार 372 रुपयांच्या तडजोडीच्या रक्कमेचे दावे निकाली काढण्यात आले. लोक अदालतीचे आयोजन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या नियोजनाखाली करण्यात आले. या कार्यात जिल्हा न्यायाधीश-1 ए. जी. जोशी, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, वकील वर्ग, बँक व पतसंस्थांचे प्रतिनिधी तसेच पक्षकारांचे सहकार्य लाभले. सर्व घटकांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही लोक अदालत यशस्वी झाल्याचे सांगत सचिव संजय सहारे यांनी सर्वांचे आभार मानले.

# विशेष गौरव पुरस्कारासाठी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांकडून अर्ज आमंत्रित

**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील माजी सैनिक, वीर पत्नी आणि त्यांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने 'विशेष गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पात्र उमेदवारांनी 1 सप्टेंबर 2026 पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. या विशेष गौरव पुरस्कारासाठी काही प्रमुख निकष निश्चित करण्यातआलेआहेत.

# दर्यापुरात मुसळधार पाऊस शेतकरी वर्ग सुखावला

प्रतिनिधी २१ जुलै



**अमरावती :** गेल्या अनेक दिवसापासून दर्यापूर दमदार पाऊस नव्हता.

मात्र आज सायंकाळी साडेसहा सहा वाजता दरम्यान दर्यापूर शहराला पावसाने झोडपून काढले.

सुमारे पाऊण तास झालेल्या या पावसाने शेतकरी वर्ग ही सुखावला.

रस्त्यावर ठिकठिकाणी पावसाचे पाणी साचले होते.

या पावसाळ्यातला हा पहिलाच दमदार पाऊस असल्याचे बोलल्या जात आहे.

त्यामुळे तालुक्यात ज्या-ज्या ठिकाणी पाऊस झाला. तिथे पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे.

आज शहरात पाऊस पाऊन तास विजेचा गडगडासह मुसळधार पाऊस कोसळला.

# बुडो मार्शल आर्ट असोसिएशन ऑफ अमरावती डिस्ट्रिक्ट च्या वतीने 2 री जिल्हास्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धा




**अमरावती :** रविवार दिनांक १९ जुलै रोजी गुरुकुल व्यायाम शाळा, सातुर्ना अमरावती येथे २ री जिल्हास्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धेचे आयोजन बुडो मार्शल आर्ट असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष शिहानलहूपारवेवतांत्रिकअधिकारी शिहान संतोष कुळकर्णी यांच्या मार्गदर्शनाखालीअमरावतीजिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सेंसेई उमेश मोवळे यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते. स्पर्धेमधे अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी सब-ज्युनिअर, ज्युनिअर, सिनिअर गटात उत्कृष्ठ खेळ दाखवून यश संपादित करीत बुडो मार्शल आर्ट स्पर्धा उत्साहात संपन्न केल्या. कार्यक्रमाप्रसंगी माजी स्थायी समिती सभापती तुषार भारतीय, अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष सेन्सेई उमेश भा. मोवळे, उपाध्यक्ष चेतन वाटनकर, सचिव विशाल चव्हाण, सह-सचिव सागर मेश्राम, कोषाध्यक्षआशिषवाघमारे,सदस्य जय कारंजकर, पिंकी प्रजापती, अभिषेककडू,मुकेशभोयरवविद्यार्थी यांच्याप्रयत्नातूनस्पर्धायशस्वीरित्या संपन्न झाली. अशी माहिती सेन्सेई उमेश भा. मोवळे अध्यक्षअमरावतीजिल्हाबुडोमार्शल आर्टअसोसिएशन्यांनीदिली.

# न्यू गणेश कॉलनीतील अनधिकृत बांधकामाची महापौर श्रीचंद तेजवानी व आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्याकडून पाहणी

## २०० वर्षे जुन्या श्री काली नदी महादेव बाबा मंदिराचा मार्ग मोकळा करण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी २१ जुलै



**अमरावती :** अमरावती शहरातील न्यू गणेश कॉलनी परिसरात सुमारे २०० वर्षांपूर्वीच्या ऐतिहासिक आणि श्रद्धास्थान असलेल्या श्री काली नदी महादेव बाबा मंदिराकडे जाणारा सार्वजनिक मार्ग बंद करून त्या जागेवर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याच्या गंभीर तक्रारीची दखल घेत अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंद तेजवानी आणि महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी संबंधित ठिकाणीप्रत्यक्षभेटदेऊनसविस्तर पाहणी केली. या पाहणीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये महानगरपालिका प्रशासनाकडून तातडीने कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, न्यू गणेश कॉलनीतील हे मंदिर गेल्या दोन शतकांपासून परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचे केंद्र आहे. दररोज अनेक भाविक या मंदिरात दर्शनासाठी येतात. महाशिवरात्री, श्रावण महिना आणि इतर धार्मिक उत्सवांच्या काळात येथे मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती असते. मात्र मंदिराकडे जाणारा पारंपरिक सार्वजनिक मार्ग अडवून त्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याने भाविकांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. याच परिसरात असलेले विशाल आणि अनेक दशकांपासून परिसराची ओळख असलेले वडाचे वृक्ष हे पर्यावरणीय तसेच धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे मानले जाते. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनधिकृत बांधकामामुळे या वृक्षाच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला असून परिसरातील नैसर्गिक वारसा धोक्यात आला आहे. त्यामुळे वडाचे वृक्ष आणि मंदिराचा मार्ग दोन्ही सुरक्षित ठेवण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी स्थानिकांनी केली. महापौर श्रीचंद तेजवानी आणि आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी पाहणीदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांकडून संपूर्ण माहिती घेतली.जागेचीस्थिती,बांधकामाचे स्वरूप, सार्वजनिक मार्गाची सद्यस्थिती तसेच उपलब्ध कागदपत्रांची प्राथमिक माहिती त्यांनीजाणूनघेतली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ!

## * राजस्थान कॉलेजच्या अतिक्रमणाबाबत महसूल प्रशासनाचे 'मौनव्रत'
## * सरकारी जागेतील गरीबांचे झोपडे पाडते, पण धनदांडग्यांचे कायम ठेवते
## * संघर्षी सुभाष देवढे पाटील यांचा १३ वर्षापासून शासनाकडे पाठपुरावा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालीत राजस्थान आर्य महाविद्यालयाने जवाहर नवोदय विद्यालयाच्या जवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून मुलींचे वसतीगृह बांधले आहे. या गैरप्रकाराबाबत जागरूक नागरिक तथा गोर गरीबांच्या कल्याणासाठी घरावर तुळशीपत्र ठेवून त्यांना न्याय देण्यासाठी तत्पर असणारे संघर्षी, समाजसेवी सुभाष देवढे पाटील यांनी या प्रकरणाबाबत १३ वर्षापूर्वी आवाज उठवला आहे. परंतु






शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण

शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण!

वस्तीगृहाच्या नावावर अनुदान लूटले, आता पुन्हा बांधकाम करीत सुटले

अतिक्रमण

गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात!

गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात

शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण...

वस्तीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फसवणूक

* चौकशी करून गुन्हे दाखल करा ; अन्यथा आंदोलन * सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे पाटील यांचा इश

### १३ वर्षाचा लढा, अतिक्रमण काढा

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी १३ वर्षापासून लढा देत आहेत. विविध आंदोलन व उपोषण, निवेदनातून अतिक्रमण काढण्याची मागणी करीत आहेत.

कथित संस्थाचालकांना राजाश्रय असल्यामुळे वाशीम जिल्ह्यातील जबाबदार असलेल्या महसूल प्रशासनाने मौनव्रत धारण केल्याचे चित्र आहे. या शासकीय जागेवर थाटात बांधलेल्या आणि अद्यापही वापरात नसलेल्या मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम जमीनदोस्त करण्याच्या मागणीसाठी सुभाष देवढे पाटील तब्बल १३ वर्षांनी पुन्हा आक्रमक झाले आहेत. वाशीम शहरातीलच नव्हेतर जिल्ह्यातील उच्च शिक्षणासाठी नावारूपास आलेल्या राजस्थान आर्य कला, मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि एस.आर.राठी विज्ञान महाविद्यालय, रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयाची मोठ्ठी टोलेजंग ईमारत वाशीम-काटा रस्त्यावर थाटात उभी आहे. हे महाविद्यालय राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळ, वाशीम या संस्थेमार्फत सुरू आहे.

याच महाविद्यालयाच्या समोरच्या भागात जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाने खेळाच्या मैदानासाठी अतिक्रमण केलेले आहे. याच जागेतील १० हजार फुटापेक्षा जास्त जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाने मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळाच्या कथित संचालकांनी मुलींचे वसतीगृह २०१० साली बांधले आहे. हे बांधकाम पुर्णत: बेकायदेशीर असल्याचा आरोप तक्रारकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी केला आहे. या प्रकरणी सर्वप्रथम २०१३ मध्ये सुभाष देवढे पाटील यांनी जिल्हाधिकारी, वाशीम यांचेकडे तक्रार केली होती.

पाठपुरावा पण केला. तसेच दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेतही हा प्रश्न उपस्थित करून ' या' राजाश्रय असलेल्या अतिक्रमणाला जमीनदोस्त करण्याची मागणी केली होती.

परंतु महसूल प्रशासनाने अद्यापपर्यंत ' या' अतिक्रमणाला त्यांचा पाठींबा देवून मौनव्रत धारण केल्याचे वास्तव आहे. शासकीय जागेवर गरीबांचे झोपडे असले तर तात्काळ ते झोपडे हटवण्यासाठी सर्व महसूल प्रशासन एका ठिकाणी येवून ते झोपडे काढण्यासाठी पुढाकार घेते. परंतु राजाश्रय असलेल्या कथित संस्थाचालकांनी अतिक्रमण करून नियमबाह्य, बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत जमीनदोस्त करण्यासाठी आणि ती शासकीय जागा ताब्यात घेण्यासाठी केव्हा पुढाकार घेणार असा प्रश्नही देवढे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

## थोडक्यात

### मंगरुळपीर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या इमारतीचे भूमिपूजन




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरुळपीर दि. १८ जुलै २०२६ : रोजी येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या नूतन इमारतीचा भूमिपूजन व कोनशीला समारंभ सायंकाळी ६.३० वाजता संपन्न झाला. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती श्री. अनिल स. किलोर साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती सिद्धेश्वर सु. ठोंबरे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाशिमचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम साहेब होते.

या सदर सोहळयाच्या वेळे मा. जिल्हा न्यायाधीश-१ वाशिम जे.पी.झपाटे साहेब सागर मुंगिलवार साहेब, पंकज नायगावकर साहेब, के.सी.कलाल साहेब, एस.डी.तारे साहेब, श्रीमती पी.व्हा राणे मॅडम एस.एस.सहस्त्रबुद्धे, साहेब, श्रीमती सहस्त्रबुध्दे मॅडम, श्रीमती ए.आर.फक्राबदकर मॅडम उपस्थित होते. तसेच आ.श्याम खोडे सह आणि पक्षकार व मोठया संख्येने जिल्हा तसेच तालुकयातील वकिल वर्ग, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधिक्षक, वाशिम निकेश खाटमोडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आवारी तसेच चेके, उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर, आणि मंगरुळपीर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेळके व पोलीस कर्मचारी तसेच मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग अमरावती श्रीमती सुष्मा बोंद्रे, उपमुख्य वास्तूशास्त्रज्ञ श्रीमती कविता बी. रंगारी, अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ अकोला सुनिल थोटांगे, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम, शासकीय कंत्राटदार सारडा जी यू.एस.बिरारीस आणि उपाध्यक्ष जिल्हा विधीज्ञ मंडळ तिफने, सचिव विधीज्ञ मंडळ श्री. वैभव बेलोकार, अधिवक्ता ii.एम.ठाकरे, अधिवक्ता श्री. मनोज येवले, अधिवक्ता निकीता सावंत प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी मा. जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मंगरुळपीर श्रीमती प्रज्ञा सं. काळे यांनी उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, वकील, कर्मचारी आणि नागरिकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### शिक्षण, न्याय व संविधानिक मूल्यांच्या समर्थनार्थ शांतता रॅली



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

शिक्षण व्यवस्थेतील कथित अनियमितता, परीक्षांमधील घोटाळे, पर्यावरण संरक्षण तसेच संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी मंगरूळपीर शहरात सोमवारी (दि. २०) शांततापूर्ण व संविधानिक पद्धतीने भव्य शांतता रॅली काढण्यात आली.


रॅलीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. सहभागी नागरिकांनी शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत शांततेचा संदेश दिला. संपूर्ण कार्यक्रम शांततापूर्ण वातावरणात पार पडला. या आंदोलनातून संविधानिक मूल्यांबाबत जनजागृती करण्याबरोबरच शिक्षण व्यवस्था अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, विद्यार्थी, युवक, महिला तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आंदोलनानंतर तहसील प्रशासनाने निवेदन स्वीकारून संबंधित मागण्या शासनापर्यंत पोहोचविण्याचे आश्वासन दिले. या निवेदनावर चंचल खिराडे, चंदाठाकुर, शोभा जाधव, विशाखा भगत, लता मनवर, रंजना मनवर, चारूलता इंगोले, सुशिला खाडे, इंदुबाई खडसे, विद्या सोनोने, आशा मनवर, विद्या खिराडे, सुषमा भगत, रुपाली भगत, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लेमन सोडा बाटलीवर नाही एक्सपायरी डेट, कारवाई करा थेट !

## *शेलुबाजार येथील अक्षम्य प्रकार *अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ?

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील शेलुबाजार येथील कोल्ड्रिंक्स सेंटर, पानठेले आणि किराणा दुकानांमधून सर्रास विक्री होणारे थंड पेय ' लेमन सोडा ' या पेयाच्या बाटलीवर उत्पादन तारखेची कोणतीही नोंद नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. सदर लेमन सोड्याची मुदत उत्पादनानंतर तीन महिने असल्याचा बाटलीवर उल्लेख आहे. मात्र बाटलीवर उत्पादन तारीखच नसेल तर अंतिम मुदतीचे तीन महिने कसे कळणार ? उत्पादक कंपनीची ही अक्षम्य चूक असून यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या गंभीर प्रकरणात अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ? असा प्रश्न स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.







पुरव्यासहित हाती आलेल्या माहितीनुसार मंगरूळपीर तालुक्यात येत असलेल्या शेलुबाजार येथील एका सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर कंपनीच्या २०० मी.ली. लेमन सोडा बाटलीवर इएऐंघ्लायसन्स क्रमांक असूनही उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमतची जागा पूर्णपणे रिकामी ठेवण्यात आली आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर चिटकवण्यात आलेल्या लेबलवर फक्त ' SEE BOTTLER NECK/CAP असे स्पष्ट लिहिले आहे, मात्र बाटलीच्या झाकणावर कोणतीही नोंद नाही. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ नुसार प्रत्येक खाद्यपदार्थांवर उत्पादन तारीख, अंतिम तारीख आणि बॅच नंबर लिहिणे बंधनकारक आहे. असे असतांनाही लेमन सोडा उत्पादक कंपनीने कायदा धाब्यावर बसवून नियमांचे उल्लंघन करून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू केला आहे. तर उन्हाळ्याच्या दिवसात लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्रास अशी थंड पेय पिली जातात. त्यामुळे अशा खाद्यपदार्थांचे उत्पादन करणारे उत्पादक कायदा व नियम पाळतात की नाही हे पाहणे खुप गरजेचे झाले आहे. या गंभीर प्रकाराबाबत अधिक शहानिशा केली असता, ' बाटलीवर तारीखच नसेल तर सदर लेमन सोडा जुना आहे की ताजा हे कसे कळणार ? त्यामुळे लहान मुलांना देताना भीती वाटते,' अशा प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केल्या आहेत. या अक्षम्य प्रकरणाची अन्न व औषध प्रशासन विभाग सखोल चौकशी करुन सबंधित कंपनी आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### FSSAI नियमानुसार काय आहे कायद्यात ?

FSSAI अन्न सुरक्षा कायदा २००६ कलम १८ नुसार कुठल्याही खाद्य पदार्थांच्या बाटलीवर अथवा जो काही डब्बा, खोका असेल अशा पॅकेजिंगवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि बेस्ट बिफोर किंवा उपयोगात असल्याची अंतिम तारीख स्पष्ट आणि ग्राहकाला दिसेल अशा ठळक अक्षरात लिहिणे अनिवार्य आहे. सदर कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना एक लाख रुपये दंड अधिक सहा महिने कैद होऊ शकते. अथवा प्रकरण जास्तच गंभीर निघाल्यास याहीपेक्षा कठोर कारवाई होऊ शकते. कारण अन्न सुरक्षा ही मनुष्याच्या जीवनाशी निगडित असल्याने उपरोक्त नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. त्यामुळे शेलुबाजार येथील या अक्षम्य प्रकरणात कारवाई होणार की थातुर - मातुर चौकशी करुन असाच काळाबाजार पुढेही सुरू राहणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### विद्यार्थ्यांचेही आरोग्य धोक्यात..

अत्यंत धक्कादायक माहिती समोर येत असून सबंधित लेमन सोडा फॅक्टरी शाळेच्या परिसराला लागून असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थी सुद्धा हा लेमन सोडा मोठ्या आवडीने पितात अशी माहितीसुद्धा पुढे येत असून सदर उत्पादकाचा हा घाणेरडा प्रकार उघडकीस आल्याने पालकांमध्येही एकच खळबळ उडाली आहे. परिणामी या गंभीर प्रकरणाची अन्न व औषध प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी जोर धरत आहे.

# विद्या भारतीच्या शाळा संपर्क अभियानाचा शुभारंभ !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

विद्याभारती वाशिम जिल्ह्याच्या वतीने सोमवार दिनांक २०/७/२०२६ रोजी शाळा संपर्क अभियानाचा शुभारंभ सकाळी ९ वाजता वाशीम येथील विद्यासागर गुरुकुल शाळेतून करण्यात आला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यासागर गुरुकुल संस्थेचे अध्यक्ष श्री.विनोदजी गडेकर हे होते तर उद्घाटक म्हणून रा.स्व.संघाचे वाशिम नगर संघचालक दिपकदादा जहागीरदार होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्या भारती विदर्भ प्रांत सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा.दिलीपजी जोशी




होते. प्रमुख उपस्थितीत विद्याभारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष एड.सत्त्यानंद कांबळे, जिल्हाध्यक्ष प्रा.अनिल धूमकेकर आणि जिल्हा मंत्री प्रा.श्रीकांत जोशी हे होते. विद्यासागर गुरुकुलच्या प्राचार्या सौ.ममता गुप्ता मंचावर उपस्थित होत्या.

अभियानाचा कार्यक्रम विद्यासागर गुरूकुलने मंत्रमुग्ध करणारा केला.

# शिरपूर जैन परिसरात अवैध धंद्याचा सुळसुळाट!


## *अवैध धंदे तातडीने बंद करावे * अन्यथा १५ ऑगस्ट रोजी लोकशाही पद्धतीने आंदोलनाचा इशारा

● सिटी न्युज ब्युरो @ शिरपूर ●

शिरपूर जैन हे जैन धर्माचे पवित्र तीर्थक्षेत्र असुन येथे देश विदेशातुन हजारो लोक दर्शनासाठी येत असतात येथे अशा पवित्र पर्यटन क्षेत्रात अवैध धंद्याची अवैध लाखो रुपयाची उलाढाल सुरू आहे

शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील सुरू असलेले अवैध धंदे वरली मटका दारू जुगार बस स्टँड परिसरात अवैध धंद्याचा सुळसुळाट आलेला आहे शिरपूर हे गाव २५ ते ३० हजार लोकसंख्या असलेले गाव आहे शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत ५९ गावे जोडलेले आहेत शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंद्यांना ऊत आला असून परिसरातील हे धंदे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत

या अवैद्य व्यवसायामुळे कोणत्याही प्रकारचा अनापेक्षित प्रकार होऊ शकतो शिरपूर पोलीस ठाण्यात नुकतेच रुजू झालेले नवीन ठाणेदरांनी या अवैध धंद्यावर वचक ठेवण्याऐवजी उलट असे बेकायदेशीर कृत्यांना खुलेआम प्रोत्साहन दिल्याचा गंभीर आरोप ऑनलाइन तक्रारीत नमूद करण्यात आला आहे तसेच समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे कोणतीही मोठी अप्रिय घटना घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे असे थेट आरोप भारतीय जनता पार्टी चे अल्पसंख्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष कलीम रेगीवाले यांनी केला आहे अनेक कार्यकर्ते आणि नागरिकांनी कलीम रेघी वाले यांच्या नेतृत्व खाली एकत्र येऊन स्वाक्षऱ्यांची मोहीम राबवून या तक्रारी ला पाठिंबा दिला आहे प्रशासनाने तत्काळ दखल न घेतल्यास सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ शकते प्रशासनाने कार्यवाही न केल्यास १५ अगस्त



२०२६ रोजी वाशिम जिल्हा भारतीय जनता पार्टी अल्पसंख्या मोर्चाच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष कलीम रेगीवाले यांच्यावतीने जिल्ह्याचे पालकमंत्रीयांना घेराव टाकून प्रशासनाला जाब विचारण्यात येईल व एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याची इशारा देण्यात आला आहे

# रामेश्वर चव्हाणांचा सन्मान; वाशीम पोलीस दलाचा वाढला मान !





● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

यवतमाळ येथील पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ मध्ये अमरावती परिक्षेत्रात वाशीम जिल्हा उपविजेता; पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांना सुवर्णपदक यवतमाळ येथे पार पडलेल्या पोलीस कर्तव्य मेळावा-२०२६ मध्ये अमरावती परिक्षेत्रातून वाशीम जिल्ह्याने उपविजेतेपद पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याने ६ सुवर्ण, ८ रौप्य आणि ४ कांस्य, अशी एकूण १८ पदके पटकावून अमरावती परिक्षेत्रात आपली वेगळी छाप पाडली.

मेळाव्यातील गुन्हे तपास, फौजदारी कायदे, नियम, कार्यपद्धती व न्यायालयीन निर्णय या विषयावरील लेखी स्पर्धेत पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक मिळविले. त्यांच्या या यशामुळे वाशीम जिल्हा पोलीस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. रामेश्वर चव्हाण यांनी यापूर्वी शिरपूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार म्हणून कार्यरत असताना अवैध धंद्यांवर कठोर कारवाई, गंभीर गुन्ह्यांचा जलद तपास, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे तसेच नागरिकांशी सुसंवाद या माध्यमातून एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली. त्यानंतर सध्या रिसोड पोलीस ठाण्याचा कार्यभार सांभाळताना देखील प्रभावी पोलीसिंग, गुन्हे उघडकीस आणणे, संघटनात्मक समन्वय आणि गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवत त्यांनी आपल्या कार्यक्षमतेची छाप कायम ठेवली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली वाशीम जिल्ह्यातील आणखी १७ पोलीस अधिकारी व अंमलदारांनी विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवत जिल्ह्याचा गौरव वाढविला. या यशाबद्दल पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण व सर्व पदक विजेत्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# दर्शन घेऊन दानपेटी फोडली,
## मसला पेन येथे साईबाबा मंदिरात घटना घडली

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील मसला पेन येथे चोरट्यांनी दर्शन घेऊन नंतर दानपेटी फोडून त्यातील ९५ हजार रुपयांचा एवज़ अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना दिनांक १९ जुलै रोजी रात्री दरम्यान रिसोड तालुक्यातील शिरपूर पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मसला पेन येथे साई बाबा मंदिरात घडली.

सदर घटना दिनांक २० जुलै रोजी सकाळी पुजारी व अन्य दर्शन घेणारे भाविक भक्त जेव्हा मंदिरामध्ये आले त्यावेळेस ही घटना उघडकीस आली. चोरीची संपूर्ण घटना मंदिरातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाली असून चोरटा चोरी करत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. याबाबत तेजराव केशवराव शिंदे रा. मसला पेन ता रिसोड जि वाशीम यांनी शिरपूर पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते नेहमी प्रमाणे सकाळी ५ वा च्या



### ९५ हजार रुपयांचा एवज़ लंपास

दरम्यान मंदीरात गेले असता त्यांना मंदीराचा मुख्य दरवाजा उघडा दिसल्याने त्यांना संशय आल्याने मंदीराच्या गाभाऱ्यात जाऊन पाहीले असता दानपेटीचे कुलुप तोडलेले दिसले व खाली चिल्लर पैसे पडलेले दिसले व मंदीराच्या दान पेटीतील सोने चांदी रोख असा एकुण ९५,००० रु.चा एवज़ अज्ञात चोरट्याने चोरुन नेले शिरपूर पुरुषांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा

मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# संग्रामपुरात पुन्हा 'म्युल खाते' उघड; सायबर जाळे सक्रिय ?

प्रतिनिधी २१ जुलै

## दुसरा गुन्हा दाखल : बँकेच्या खातेदाराविरुद्ध कारवाई

**संग्रामपूर:** संग्रामपूर तालुक्यात 'म्युल बँक खाते' प्रकरण पुन्हा समोर आले असून, अवघ्या दोन दिवसांत दुसरा गुन्हा दाखल झाल्याने खळबळ उडाली आहे. राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी व समन्वय पोर्टलवरील माहितीच्या तांत्रिक विश्लेषणातून महाराष्ट्र बँकेच्या संग्रामपूर शाखेतील एका खात्याचा सायबर फसवणुकीसाठी वापर झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर तामगाव पोलिसांनी संबंधित खातेदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३१ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या ऑनलाइन आर्थिक फसवणुकीतील ५० हजार रुपयांची रक्कम 'लेयर-२' स्तरावरील संबंधित खात्यात जमा झाल्यानंतर धनादेशाद्वारे काढण्यात आल्याचे तपासात उघड झाले. याप्रकरणी तामगाव पोलिस ठाण्यातील अंमलदार मनीष वानखडे यांच्या फिर्यादीवरून संबंधित खातेदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी १७ जुलै रोजी सोनाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बावनबीर येथील महाराष्ट्र बँक शाखेतील एका खातेदाराविरुद्ध अशाच प्रकारचा गुन्हा दाखल झाला होता. त्या प्रकरणातील संशयिताची चौकशी सुरू असतानाच संग्रामपूरमधील दुसरे प्रकरण उघडकीस आल्याने ग्रामीण भागात सायबर गुन्हेगारांचे जाळे सक्रिय असल्याची शक्यता व्यक्तकेलीजातआहे.

> कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपले बँक खाते इतरांच्या वापरासाठी देऊ नये तसेच संशयास्पद आर्थिक व्यवहार आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.
>
> **संदीप काळे,**
> ठाणेदार, सोनाळा

> नागरिकांना बँक व्यवहार करताना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. कोणत्याही अनोळखी व्यक्तीला आपले बँक खाते वापरण्यास देऊ नये, बँक खात्यात संशयास्पद रक्कम जमा झाल्यास तातडीने पोलिसांशी किंवा सायबर शाखेशी संपर्क साधावा, तसेच ओटीपी, बँक खात्याची गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये.
>
> **श्रीकांत निचड,**
> ठाणेदार, तामगाव

# लोकशाही व संविधानाच्या संरक्षणासाठी कृती समितीच्या वतीने खामगावात मोर्चा

## सोनम वांगचूक यांच्या समर्थनार्थ आंदोलन

प्रतिनिधी २१ जुलै



**खामगाव:** पर्यावरणवादी सोनम वांगचूक यांच्या समर्थनार्थ, तसेच लोकशाही, भारतीय संविधान आणि नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी सोमवारी खामगावात संविधानिक शांती मार्च काढण्यात आला. विविध सामाजिक, राजकीय व पुरोगामी संघटनांसह संविधानप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातून शांती मार्चला सुरुवात झाली. शांततापूर्ण आणि संविधानिक मार्गाने काढण्यात आलेल्या या मोर्चात विद्यार्थी, युवक, महिला, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. लोकशाही मूल्यांचे जतन, भारतीय संविधानाचा सन्मान, नागरिकांच्या मूलभूत अधिकारांच्या संरक्षणाच्या मागणीसाठी घोषणाबाजी करण्यात आली.

### उपविभागीय अधिकाऱ्यांना मागणीचे निवेदन

मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचल्यानंतर उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपती व पंतप्रधान यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनातून दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यात आला, तसेच लोकशाही व्यवस्था, संविधानिक मूल्ये आणि नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

# भिंगारा-चाळीस टपरी येथील शाळेत 7 शिक्षकांची तात्पुरती नियुक्ती

प्रतिनिधी २१ जुलै

## पालकांच्या आंदोलनाला यश विद्यार्थ्यांना दिलासा

**खामगाव:** निवडणूक विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या एसआयआर मोयादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी ही मोही

प्रतिनिधी जळगाव जा तालुक्यातील दुर्गम आदिवासी ग्राम भिंगारा आणि चाळीस टपरी येथील शाळांमध्ये शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा मुद्दा घेऊन पालकांनी २० जुलै रोजी बुलढाणा येथे जिल्हा परिषदेवर केलेल्या आंदोलनाला यश आले आहे.

प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून या दोन्ही शाळांसह परिसरातील शाळांमधील रिक्त पदांवर तात्पुरत्या स्वरूपात शिक्षकांच्या नियुक्तीचे आदेश काढले आहेत. २० जुलै रोजी जिल्हा परिषद बुलढाणा आणि पंचायत समिती जळगाव जामोदच्यावतीने हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. जिल्हा परिषद हायस्कूल खामगाव येथील अतिरिक्त शिक्षक बाजीराव ज्ञानदेव खराटे आणि कैलास महादेव खांदरे यांचे समायोजन भिंगारा येथील जि.प.उ.प्रा. शाळेत करण्यात आले आहे. तर म.प्रा. शाळा चाळीस टपरी येथील शिक्षक चिट्ठल सुंदर पुरी यांची नियुक्ती त्याच शाळेत करण्यात आली आहे. गजानन ओंकार वाकोडे यांची म. प्रा. शाळा माहुली येथे, तसेच ३ शिक्षण स्वयंसेवकांची नियुक्ती ६ वी ते १० वी वर्गासाठी करण्यात आली आहे. स्वयंसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन दिले जाणार आहे.

प्रशासन काय म्हणते विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी RTE २००९ नुसार ही तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे. संबंधित मुख्याध्यापकांनी शिक्षकांना तात्काळ कार्यमुक्त करून रुजू करून घ्यावे, असे आदेशात म्हटले आहे.

# अ.जा. आरक्षणाच्या उपवर्गीकरणासाठी राज्यव्यापी आंदोलन-अंभोरे

प्रतिनिधी २१ जुलै

## शेगावात सकल मातंग समाजाची राज्यस्तरीय बैठक

**शेगाव :** अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याबाबत राज्य शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, या प्रमुख मागणीसाठी सकल मातंग समाजाची राज्यस्तरीय बैठक समाजाचे नेते विजय अंभोरे यांच्या अध्यक्षतेखाली शेगाव येथे १९ जुलै रोजी उत्साहात पार पडली.

बैठकीत राज्यातील समाज प्रतिनिधींनी सविस्तर चर्चा करून शासनाने लवकरात लवकर उपवर्गीकरणाचा निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

बैठकीत उपस्थितांनी अनुसूचित जातीतील विविध घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे तसेच आरक्षणाचा लाभ समतोल पद्धतीने मिळण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. अनेक वर्षांपासून ही मागणी प्रलंबित असून शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी एकमुखी भूमिका मांडण्यात आली. उपस्थितांनी सांगितले की, शासनाने त्वरित निर्णय न घेतल्यास संपूर्ण राज्यभर सकल मातंग समाजाच्या वतीने व्यापक आंदोलन उभारण्यात येईल. या आंदोलनाची रूपरेषा व पुढील कार्यक्रम राज्यस्तरीय बैठकीत निश्चित करून लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

बैठकीत समाज संघटन अधिक मजबूत करणे, युवकांना संघटनेशी जोडणे, शिक्षण, आरक्षणासंदर्भातील विविध कायदेशीर व सामाजिक बाबींवर सखोल विचारविनिमय करण्यात आला. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी सर्व स्तरावर एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

या बैठकीस राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीस उपस्थित मान्यवरांमध्ये राम वाघमारे, कैलास आकोडे, परसराम दादा कांबळे, रवींद्र कांबळे, खंडेराव मुंद्रे, संजय पाडळे, विनोद जोगदंड, डॉ. चंद्रशेखर अविनाश बागडे, निवृत्ती तांबे, सोपान पानपाटील यांच्यासह समाजातील अनेक प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे संयोजन लक्ष्मणराव गवई यांनी केले

# 'इस्कॉन' च्यावतीने श्री जगन्नाथ रथयात्रा

प्रतिनिधी २१ जुलै



**खामगाव :** 'इस्कॉन'च्या वतीने १८ जुलै रोजी शहरातून भव्य श्री जगन्नाथ बलभद्र आणि सुभद्रा महाराणी यांचा दिव्य रथयात्रा महोत्सव उत्साहात पार पडला. यावेळी शहरातून प्रमुख मार्गाने भव्य रथयात्रा काढण्यात आली.

स्थानिक नांदुरा रोडवरील इस्कॉन सेंटर येथे आरती झाल्यानंतर संध्याकाळी ५ वाजता श्री भगवान जगन्नाथ रथयात्रेला सुरुवात करण्यात आली. टॉवर चौक, एकबोटे चौक, नॅशनल हायस्कूल चौक, फरशी, मोहन चौक, अर्जुन जल मंदिर, केडिया टर्निंग या मार्गाने ही रथयात्रा काढण्यात आली. सदर रथयात्रेचे शहरात ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करुन स्वागत करण्यात आले. या रथयात्रेत मोठ्या संख्येने महिला भाविकांचा सहभाग होता.

पारंपारिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांनी हरीनामाचा गजर करत भजन, कीर्तनाच्या भक्तीभावाने रथयात्रेत वातावरण अधिक मंगलमय झाले होते. लहानमोठ्यांपासून या रथयात्रेतील सहभाग लक्षवेधी ठरत होता. ही रथयात्रा डिडवाणीया धर्मशाळेत पोहचल्यानंतर त्या ठिकाणी अहिरभाव दास प्रभुजी अकोला यांचे प्रवचन पार पडले. यामध्ये भगवान जगन्नाथ कथेतून त्यांच्या अवतारावर प्रकाश टाकण्यात आला. त्यानंतर महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. धर्मशाळा बैठकव्यवस्था, लाईटींग, साऊंडशिस्टीम ही सेवा निशुल्क महाराजा मसाला उद्योगाचे सर्वेसर्वा संतोष शेठ डिडवाणी यांनी उपलब्ध करुन दिली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी 'इस्कॉन' परिवार खामगावच्या वतीने परिश्रम घेण्यात आले.

# एकबोटे चौकात वाहतूक कोंडी; अपुऱ्या नियोजनामुळे ताण!

प्रतिनिधी २१ जुलै

**खामगाव :** शहरातील एकबोटे चौकात वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात वाढल्याने दररोज वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. सध्या जगदंबा चौक ते शहर पोलिस स्टेशन या मार्गावरील पुलाचे काम सुरू असल्याने या रस्त्यावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. परिणामी, एकबोटे चौक मार्गावर वाहतुकीचा अतिरिक्त भार पडत असून, परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

या मार्गावर वाहनांची संख्या लक्षणीयरीत्या वाढल्याने सकाळी व सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत चौकात दीर्घकाळ वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत असून वेळेची नासाडीही मोठ्या प्रमाणात होत आहे. विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयीन वेळेत परिस्थिती अधिक बिकट होत असल्याचे दिसून येते. स्थानिक नागरिकांच्या मते, चौकात प्रभावी वाहतूक नियोजनाचा अभाव आणि अपुरी नियंत्रण व्यवस्था, यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत आहे.

वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांची नियमित उपस्थिती आणि पर्यायी मार्गाचे योग्य नियोजन आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, पत्नी व पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार

प्रतिनिधी २१ जुलै

**बुलढाणा :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांना सैनिक कल्याण विभागामार्फत विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह १० सप्टेंबर पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

या योजनेअंतर्गत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळातील पुरस्कार प्राप्त खेळाडू, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य आदी कला क्षेत्रातील पुरस्कार विजेते, यशस्वी उद्योजक, संगणक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे तसेच पूर, आग, दरोडा, अपघात व इतर नैसर्गिक आपत्तीमध्ये धाडसी व बहुमोल कार्य करणारे आणि देश व राज्याची प्रतिष्ठा उंचावेल असे लक्षणीय योगदान देणारे माजी सैनिक, त्यांच्या पत्नी किंवा पाल्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी २५ हजार रुपये, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील कामगिरीसाठी ५० हजार रुपये इतका विशेष गौरव पुरस्कार सैनिक कल्याण विभागाकडून प्रदान केला जाणार आहे. याशिवाय, इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण तसेच बारावीच्या ब परीक्षेत ८५ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांनाही २० हजार रुपयांचा विशेष गौरव पुरस्कार देण्यात येणार आहे. बोर्ड

पात्र माजी सैनिक, त्यांच्या पत्नी व पाल्यांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज १० सप्टेंबर २०२६ पूर्वी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, बुलढाणा येथे जमा करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# कमी-अधिक पावसामुळे खरीप हंगामावर अनिश्चिततेचे सावट

प्रतिनिधी २१ जुलै

**सिंदखेडराजा :** तालुक्यात यंदा पाऊस कमी-अधिक प्रमाणात पडत असल्यामुळे खरीप हंगामावर अनिश्चिततेचे सावट निर्माण झाले आहे.

तालुक्यात सोयाबीन, उडीद, मूग, तूर आणि कपाशी ही प्रमुख खरीप पिके आहेत.

सोयाबीन, उडीद, मूग व तूर या पिकांना वेळेवर व सातत्यपूर्ण पावसाची आवश्यकता असते. मात्र तालुक्यात काही भागांत पावसाचा खंड पडला, तर काही ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाल्याने या पिकांची वाढ सर्वत्र एकसारखी झालेली नाही. दुसरीकडे, ठिबक सिंचनाचा अवलंब केलेल्या शेतकऱ्यांच्या कपाशी पिकाची चांगली वाढ होत असून अनेक ठिकाणी कपाशी बहरात आली आहे. नियोजनबद्ध पाणी पुरवठ्यामुळे पावसाच्या कमी-अधिक प्रमाणाचा परिणाम कपाशीवर तुलनेने कमी झाल्याचे दिसून येत आहे. कृषी विभागाने शेतकऱ्यांना पिकांची नियमित पाहणी करणे, वेळेत तण नियंत्रण करणे, रोग व किडींचा प्रादुर्भाव आढळल्यास तातडीने कृषी सहाय्यक किंवा कृषी अधिकाऱ्यांचा सल्ला घेणे, तसेच शेतातील पाण्याचा योग्य निचरा ठेवण्याचे आवाहन केले आहे. येत्या काही दिवसांत समाधानकारक व सातत्यपूर्ण पाऊस झाल्यास खरीप पिकांना दिलासा मिळण्याची शक्यता असून, तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष आगामी पावसाकडे लागले आहे.

# ऐतिहासिक मोती तलावाचे अस्तित्व धोक्यात पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे देखण्या भिंतींना तडे

प्रतिनिधी २१ जुलै

**सिंदखेडराजा:** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आजोळ आणि मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील ऐतिहासिक वैभव असलेला 'मोती तलाव' आज पुरातत्व विभागाच्या कमालीच्या दुर्लक्षामुळेअखेरच्याघटकामोजत आहे. राजे लखुजीराव जाधव यांच्या पराक्रमी कालखंडात शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी आणि सौंदर्यात भर घालण्यासाठी बांधण्यात आलेला हा ऐतिहासिक ठेवा आता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तलावाच्या मजबूत तटबंदीवर आणि भिंतीवर उगवलेल्या मोठमोठ्या काटेरी झाडाझुडपांमुळे भिंतींना मोठे तडे गेले असून, पुरातत्व विभागाने वेळीच पावले उचलली नाहीततरहा वारसा कायमचा इतिहासजमा होण्याची भीती निर्माणझालीआहे.

राजे लखुजीराव जाधव यांच्या कार्यकाळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी अत्यंत कल्पकतेने या मोती तलावाची निर्मिती करण्यात आली होती. स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुनाम्हणूनया तलावाकडेपाहिले जाते. मात्र, आज याच ऐतिहासिक वारशाचीदुरवस्थाझालीआहे.

'एकीकडे सरकार पर्यटन आणि ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनाच्या गप्पा मारते, तर दुसरीकडे प्रत्यक्ष जमिनीवर पुरातत्व विभागाचे अधिकारी या गंभीर बाबीकडे डोळेझाक करत आहेत. हा आमच्या पूर्वजांच्या जाज्वल्य इतिहासाचा अवमान आहे. केवळ पुरातत्व विभागच नव्हे, तर स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही यागंभीरसमस्येकडेगांभीर्यानेलक्ष देणे गरजेचे आहे. सिंदखेडराजाचे वैभव असलेल्या या ऐतिहासिक वास्तूचे जतन करणे हे सर्वांचेच कर्तव्य असताना स्थानिक पातळीवर होत असलेली अनास्था खेदजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. या गंभीरपरिस्थितीमुळेसिंदखेडराजा शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. प्रशासनाला इशारा देताना नागरिकांनी सांगितले की, पुरातत्व विभागाने तात्काळ मोती तलावावरील सर्व झाडेझुडपे काढून तलावाची संपूर्ण स्वच्छता करावी आणि तटबंदीची दुरुस्ती करावी. जर प्रशासनाने या मागणीकडे दुर्लक्ष केले, तर सिंदखेडराजा येथील नागरिक, इतिहासप्रेमी आणि तरुण शांततेच्या मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. यामुळे प्रशासनाला जाग येईल आणि ऐतिहासिक मोती तलावाच्या संवर्धनाचे काम लवकरात लवकर सुरू होईल, अशीआशाआहे.

### मोठमोठेझाडे ठरतेय भिंतींच्या विनाशाचे कारण

गेल्या अनेक वर्षांपासून या तलावाची योग्य ती देखभाल दुरुस्ती झालेली नाही. सद्यस्थितीत तलावाच्या दगडी भिंतींवर आणि तटबंदीवर मोठमोठी काटेरी झुडपे आणि झाडे वाढली आहेत. या झाडांची मुळे खोलवर गेल्यामुळे ऐतिहासिक दगडी भिंतींना मोठमोठे तडे (भेगा) गेले आहेत. वेळीच ही झाडे काढून भिंतींची डागडुजी न केल्यास पावसाळ्यात किंवा पाण्याच्या दाबामुळे ही भिंत कोसळण्याची दाट शक्यता आहे.

# ग्रामीण रुग्णालयाची ना. जाधवांनी केली पाहणी

प्रतिनिधी २१ जुलै

**बुलढाणा :** साखरखेर्डा येथे बांधण्यात आलेल्या नवीन ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची पाहणी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. लवकरच ग्रामीण रुग्णालयाचे उद्घाटन होऊन ते जनतेच्या सेवेत कार्यान्वित होईल, असे त्यांनी सांगितले

ग्रामीण भागातील जनतेला सहज उत्तम आरोग्य सेवा मिळावी या दृष्टिकोनातून केंद्र व राज्य सरकारच्यावतीने ग्रामीण भागात ग्रामीण रुग्णालय बांधण्यात येत आहे बुलढाणा जिल्ह्यातील साखरखेर्डा येथेही ३० खांटाचे सुसज्ज असे ग्रामीण रुग्णालय बांधण्यात आले आहे. रविवार १९ जुलै रोजी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे साखरखेर्डा दौऱ्यावर असताना त्यांनी तेथील ग्रामीण रुग्णालयाला भेट देत तेथील कामाची पाहणी केली. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी मंडले उपस्थित होते. साखरखेर्डा येथील ग्रामीण रुग्णालयाच्यासाठी आवश्यक असलेल्या कर्मचारी पदभरतीला शासनाने मान्यता दिली आहे. लवकरहेपदेभरण्यातयेणारअसून ग्रामिण रुग्णालयात जनतेच्या सेवासाठी लोकार्पित करण्यात येणार असल्याची माहिती ना. जाधव यांनी पाहणीनंतर दिली. काही तांत्रिक कारणामुळे ग्रामीण रुग्णालयाचे काम रखडले होते, त्या सर्व बाबींच्या पूर्तता करण्यात आल्याआहे.इमारतहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार असून येत्या महिन्याभरात या ग्रामीण रुग्णालयाचेउद्घाटनहोईल,अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक दत्तात्रयबिराजदारयांनीदिलीआहे.

# "सरकार हमसे डरती है, पुलीस को आगे करती है"

## जिल्हाधिकारी कार्यालयावर जंतर मंतर सारखा युवाशक्तीचा आक्रोश

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला:** नही चलेगी नही चलेगी तानाशाही नही चलेगी, आमच्या भविष्याशी खेळणाऱ्या मंत्र्यांना खुर्ची सोडा अशा गगनभेदी घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालय दणाणून गेले होते हातात अन्यायाचा जाब विचारणारे आक्रमक फलक आणि डोळ्यात भ्रष्ट व्यवस्थाविरुद्ध धगधगनारा संताप हे चित्र होते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर.

देशातील नीट आणि टीईटी पेपर फुटींच्या घटनांमुळे परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासाहत्येवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे विद्यार्थ्यांच्या भविष्याची खेळ करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घ्यावा यासाठी शिक्षण बचाव कृती समितीने





जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन केले त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयावर हे सर्व आंदोलक जमले होते आंदोलनाचा माहोल अत्यंत आक्रमक आणि व्यवस्थेला थेट आव्हान देणार होता या आंदोलकांच्या हाती क्रांतिकारक भगतसिंग, छत्रपती शिवाजी महाराज, आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर्स दिसून आले इन्कलाब जिंदाबाद चे पोस्टर्स उंचावत तरुणांनी केंद्र सरकारच्या दडपशाही धोरणाचा तीव्र निषेध केला शिक्षण बचाव कृती समितीच्या नेतृत्वाखाली विविध राजकीय पक्ष आणि विविध राजकीय आणि सामाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या होत्या या आंदोलकांच्या गगनभेदी घोषणांनी संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय परिसर दणाणून गेले होते.

### केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना जावेच लागणार

» नीट पेपर फुटीच्या महाघोटाळ्यामुळे देशातील प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ढकलले गेले आहे न्यायासाठी तरुण महिनाभरापासून रस्त्यावर आहेत आणि सरकार मात्र सोनम वांगचुक सारख्या देशभक्तांना अटक करून आवाज दाबत आहे हा अन्याय आता सहन केला जाणार नाही जोपर्यंत धर्मेंद्र प्रधान राजीनामा देत नाहीत तोपर्यंत ही आग विझणार नाही

**एक आंदोलक**

# राम कृष्ण हरी चला जाऊ एसटीने पंढरपुरी

## पाच दिवसात दोन हजाराहून अधिक वारकरी पंढरपूर साठी रवाना

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला:** हरिनामाच्या गजरात हजारो वारकरी अकोला जिल्ह्यातून पंढरपूर साठी रवाना झाले आहेत दरवर्षी अकोला जिल्ह्यातील हजारो वारकरी शनिवार 25 जुलै रोजी आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला जातात यावर्षी अकोला मुख्य बस स्थानकावरून 50 बसेस वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिल्या गेल्या आहेत. परिवहन महामंडळाने जाहीर केल्यानुसार यावर्षीही विशेष व सेवा 17 जुलैपासून सुरू होणार होती परंतु प्रवाशांच्या मागणीमुळे ती 16 जुलैपर्यंत वाढवण्यात आली आतापर्यंत 44 फेऱ्या झाले असून 2200 हुन अधिक अधिक वारकरी पंढरपूर साठी रवाना झाले दरवर्षीप्रमाणे अकोला पंढरपूर सेवेसाठी वारकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे डेपो व्यवस्थापक पिसोडे यांच्या माहितीनुसार 45 प्रवासी झाल्यावर बस पंढरपूरकडे रवाना केली जात आहे.



### सर्वच प्रवाशांना मिळत आहे योजनांचा लाभ



» अकोला पंढरपूर बस भाडे 930 रुपये असून महिलांना 490 तिकीट लागत आहे. आतापर्यंत अकोला पंढरपूर 49 फेऱ्या रवाना झाल्या असून जवळपास 2200 हून अधिक प्रवाशांनी या यात्रा बसचा लाभ घेतला आहे जास्तीत जास्त प्रवाशांनी या सेवेचा लाभ घेऊन विठुरायाचे दर्शन घ्यावे

**अरविंद पिसोड़े,** डेपो व्यवस्थापक अकोला

# राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा 8 ऑगस्टला !

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : शालेय विद्यार्थ्यांमधील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांच्यातील सर्जनशीलता वाढविण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक कलेचा वारसा जपण्यासाठी राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठीच येत्या ८ ऑगस्टला या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये राज्यातील सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या शाळांनी सहभागी व्हावे, तसेच ऑनलाइन नोंदणी करावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अकोला यांनी केले आहे.

महाराष्ट्र कला शिक्षण मंडळाच्यावतीने ८ ऑगस्ट रोजी घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेच्या प्रवेश शुल्क व जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय बक्षिसांच्या रकमेत २०२५ पासून वाढ झाली आहे. ही परीक्षा चार गटात घेतली जाणार असून, पहिले ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात. यात सहभागी होण्यासाठी प्रतिविद्यार्थी २० रूपये प्रवेश



शुल्क असून, ड्रॉइंग कागदाचे ५ रूपये वजा करून १५ रूपये मंडळाकडे ३१ जुलैपूर्वी ऑनलाइन जमा करावयाचे आहे. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी व विद्यार्थ्यांच्या अधिकाधिक सहभागासाठी सर्व शाळेतील मुख्याध्यापकांनी अधिकृत संकेतस्थळ व लिंकवर जाऊन शाळेची व विद्यार्थ्यांची नोंदणी ऑनलाइन पद्धतीने करावयाची आहे. तसेच बालचित्रकला स्पर्धेच्या आयोजनाबाबत योग्य

### असे आहे ऑनलाइन नोंदणी वेळापत्रक

| | |
|---|---|
| गटनिहाय प्रश्नपत्रिका उपलब्ध | -३१ जुलैपर्यंत |
| केंद्र व शाळा नोंदणी | - ३१ जुलैपर्यंत |
| विद्यार्थ्यांची नोंदणी | - ३१ जुलैपर्यंत |
| प्रवेश शुल्क स्वीकारणे | - ४ ऑगस्ट |
| प्रवेश पत्र उपलब्ध | - ७ ऑगस्ट |
| स्पर्धेचा दिनांक | - ८ ऑगस्ट |

### बालकलाकारांना हक्काचे व्यासपीठ देणारा उपक्रम

» कला संचालनालय महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा ही ग्रामीण ते शहरी भागातील प्रत्येक बालकलाकाराला हक्काचे व्यासपीठ देणारा एक स्तुत्य उपक्रम आहे. तालुका ते राज्यस्तरापर्यंतची बहुस्तरीय निवड प्रक्रिया आणि एकूण ६०८ पारितोषिके यामुळे विद्यार्थ्यांना या स्पर्धेबद्दल आकर्षण आहे.

# स्वच्छतेच्या कामात हयगय खपवून घेणार नाही!

## मनपा आढावा बैठक : स्वच्छतेच्या कामाबाबत व्यक्त केली नाराजी

प्रतिनिधी २१ जुलै

अकोला : दैनंदिन स्वच्छतेचे काम व कचरा ट्रान्सफर स्टेशनबाबत आढाव बैठकीत तीव्र ताशेरे ओढण्यात आले. यापुढे स्वच्छतेच्या कामात निष्काळजीपणा व हयगय खपवून घेणार नाही, असे म्हणत मनपा कर्मचाऱ्यांना आढावा बैठकीत निर्देश देण्यात आले.

२० जुलै रोजी महापौर शारदा रणजीत खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्याव्दारे शहरातील स्वच्छतेच्या अनुषंगाने स्वच्छता विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी उपमहापौर अमोल गोगे, सभागृह नेता पवन महल्ले,



नगरसेवक धनंजय धबाले, अमोल मोहोकार, शरद तुरकर यांची उपस्थिती होती.

यावेळी महापौर शारदा रणजीत खेडकर आणि सभापती विजय अग्रवाल यांनी चारही झोन अंतर्गत सुरू असलेल्या दैनंदिन स्वच्छतेच्या कामाबाबतचा आढावा घेतला. तसेच प्रत्येक प्रभागनिहाय स्वच्छता निरीक्षकांकडून दैनंदिन करण्यात येणा-या स्वच्छतेच्या कामाचा तसेच ट्रांसफर स्टेशनच्या कामाचा आढावा घेऊन त्यांनी स्वच्छतेचे होत असलेले कामाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी सभापती अग्रवाल यांनी, कचरा ट्रांसफरचे काम संथ गतीने सुरू असून ते काम युध्द पातळीवर करणे, ट्रांसफर स्टेशनचे काम पूर्ण होईपर्यंत इतरत्र जागा शोधून त्यावर तात्पुरते कचरा टाकण्यासाठी स्थान तयार करून तेथे कचरा घंटा गाडी आणि ट्रॅक्टरचा कचरा खाली करण्यात येऊन काही टिप्पर भाड्याने लावून टाकण्यात आलेला कचरा उचलून ट्रांसफर स्टेशन येथे पाहोचविण्याची व्यवस्था करणे, दैनंदिन स्वच्छतेचे काम आपसात समन्वय साधून नियोजनबध्द व प्रभावीपणे करणे, ट्रॅक्टर दोन शिफ्टमध्ये सुरू करून त्यांची कमीत-कमी ६ ट्रिप झालीच पाहिजे या प्रकारे नियोजन करणे आदींबाबात सूचना यावेळी दिली, तसेच यापुढे स्वच्छतेच्या कामात कोणतीही हयगय किंवा कामचुकारपणा खपून घेतला जाणार नाही, अशी ताकीद यावेळी सभापती अग्रवाल यांनी दिली. या बैठकीत मनपा सहा.आयुक्त गणेश शहाणे, झोन कार्यालयाचे सहा. आयुक्त राजेश सरप, देविदास निकाळजे, मोटर वाहन विभाग प्रमुख अनिल बिडवे, स्वच्छता विभाग प्रमुख प्रशांत राजुकर, वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक शैलेश पवार, सुनिल खेते, रौशन अली यांचेसह सर्व स्वच्छता निरीक्षकांची उपस्थिती होती.

# झरीजामणीत मुसळधार तर महागाव, बाभूळगाव आणि उमरखेड तालुका कोरडाच!

प्रतिनिधी २१ जुलै

**यवतमाळ** : मृग नक्षत्राच्या सुरुवातीला दमदार पुनरागमन करून बळीराजाला आशेचा किरण दाखवणाऱ्या पावसाने जुलै महिन्याच्या मध्यात मात्र यवतमाळ जिल्ह्यात चांगलीच दडी मारली आहे. २१ जुलै अखेर उपलब्ध झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार, संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यात आतापर्यंत अवघा २५२.२ मिमी म्हणजेच सरासरीच्या ७४.७ टक्के पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षी याच कालावधीत जिल्ह्यात ३४७.८ मिमी नोंद झाली होती.

**महागाव: सरासरीच्या अवघा 57.2 टक्के (158.0 मिमी) पाऊस**
**बाभूळगाव: सरासरीच्या 53.7 टक्के (180.9 मिमी) पाऊस**
**उमरखेड: सरासरीच्या 55.4 टक्के (187.2 मिमी) पाऊस**
**यवतमाळ तालुका: सरासरीच्या 61.7 टक्के (221.4 मिमी) पाऊस**

» जिल्ह्यातील एकूण १६ तालुक्यांमध्ये पावसाचे वितरण अत्यंत असमान असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. काही ठराविक तालुक्यांमध्ये धुवाधार पाऊस झाला असला, तरी बहुतांश तालुक्यांमध्ये परिस्थिती गंभीर बनली आहे. झरीजामणी तालुक्याने यंदा बाजी मारली असून, तेथे ३५८.४ मिमी पावसासह सरासरीच्या तब्बल १४०.६ टक्के पावसाची नोंद झाली आहे. त्याखालोखाल दारव्हा तालुक्यात ९४.५ टक्के (२८९.५ मिमी) पाऊस झाला आहे. दुसऱ्या बाजूला महागाव, बाभूळगाव, उमरखेड आणि जिल्हा मुख्यालय असलेल्या यवतमाळ तालुक्यात पावसाचा मोठा तुटवडा जाणवत आहे.

# अकोल्यातून 23 व्या पाच पावली दिंडी सोहळ्याला प्रारंभ

## आषाढी वारी 2026 : आ. रणधीर सावरकर यांच्या हस्ते पूजन, 75 वारकऱ्यांचा सन्मान

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : आषाढी एकादशीनिमित्त यंदाही श्री संत पसायदान सेवा समिती, तालुका व जिल्हा अकोला यांच्या वतीने २३ वा पाच पावली दिंडी सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला. या दिंडीचे आयोजक ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज खापरकर यांच्यासह ७५ वारकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तापडिया नगर, बिर्ला रोड, अकोला येथून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. आ. रणधीर सावरकर यांच्या हस्ते श्रींचे पूजन करून दिंडीला हिरवी झेंडी दाखवण्यात आली.

याप्रसंगी बोलताना आ. रणधीर सावरकर म्हणाले, वारी ही केवळ यात्रा नाही तर ती महाराष्ट्राची जिवंत परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर-तुकाराम यांनी दाखवलेला भक्तिचा, समतेचा आणि सेवेचा मार्ग वारीतून पुढे जातो. गेली २३ वर्षे सातत्याने समाजातील विविध घटकांना पांडुरंगाचे दर्शन घडवणाऱ्या ह.भ.प. विठ्ठल महाराज खापरकर यांचे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. प्रस्थानापूर्वी अकोला पूर्वचे आ. रणधीर सावरकर यांच्या हस्ते सर्व वारकरी मंडळींना फराळ व फळ वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम भारतीय जनता पार्टी आध्यात्मिक आघाडीच्या



पुढाकाराने घेण्यात आला. यावेळी ७५ वारकऱ्यांचा शाल-श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर सर्व वारकरी 'जय हरी विठ्ठल' च्या गजरात पंढरपूरकडे रवाना झाले.

या प्रसंगी राजेश बेले - एकलारा, श्री अंबादास भाऊ उमाळे - भाजपा जिल्हा सरचिटणीस, माधव मानकर, विवेक भरणे, गिरीश जोशी, शंकरराव काकड, विष्णू गोंदकर, विलास वानखडे, पवन महल्ले, प्रशांत जोशी, ॲड. देवाशिष काकड, संदीप गावंडे, सागर शेगोकार, हर्षद भामरे, आरती धोगलीया, बबलू जगताप, निकिता देशमुख, माणिकराव वानकर, लातूरकर साहेब, दिलीपराव घोडे, संजय राव वसु, मधुकर भटकर, श्री गणेश खापरकर, गणेश कुकडे, आत्माराम, विठ्ठल लहेकर, रुपराव इंगोले, साहेबराव राऊत, बाळकृष्ण तराळकर, गजानन खंडाळकर, गजानन डिगोळे - जवळा, गोपाल खंदार, डॉ. गजानन बिहाडे, नीता विठ्ठल खापरकर, राजश्री बिहाडे, सुरेखा कर यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष वारकरी उपस्थित होते. प्रास्ताविक राजेश बेले, संचालन अंबादास उमाळे तर आभार माधव मानकर यांनी मानले.

# नीट पेपर लीकप्रकरणी चर्मकार समाजबांधवांचा एल्गार!

## राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या नेतृत्वात जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

## धरणे आंदोलन करून दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : नीट पेपर लीक प्रकरणाची निष्पक्ष चौकशी, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्था तसेच युवकांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या मागणीसाठी अकोल्यातील विविध चर्मकार समाजाच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, महिला व युवक संघटनांच्या वतीने २० जुलैला जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे देऊन निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनाला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी सोनम वांगचुक तसेच कॉकरोज जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या आंदोलनाला नैतिक



पाठिंबा देण्याचा निर्णय संयुक्त नियोजन सभेत घेण्यात आला.१९ जुलै रोजी मोठी उमरी येथील गुरु रविदास मंदिरात झालेल्या संयुक्त बैठकीत हा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सोमवारी सकाळी ११:३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे निवेदन सादर करण्यात आले असून, संविधान, निसर्ग, न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती. यावेळी देण्यात आलेल्या घोषणांनी जिल्हाधिकारी परिसर दनानला होता. निवेदन देताना राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे पदाधिकारी प्रविण चोपडे जिल्हाध्यक्ष राष्टीय चर्मकार महासंघ अकोला गजानन भटकर,रामाभाऊ उंबरकर, शिवलाल इंगळे सुनील झेड गवई, छाया ताई इंगळे ,आशा चंदन, लीना ताई चिम, प्रतिभा शिरभाते, संज्योती मांगे गजानन पदमने, मधुकर वानेडकर, प्रा. डॉ. गणेश बोरकर, अरुण परोडकर, रामदास शेगोकार,डॉ कल्याणी पदमने, विष्णू शेगोकार, मधुसूदन गव्हाळे,रामभाऊ ताजने, पांडुरंग वाडेकर, राजेश परोडकर,रजनीताई भागवते रत्ना पानझाडें, प्रकाश ठोंबरे, योगेश इंगळे, नितीन वानेडकर, हिम्मत शेगोकार, श्रीराम राखोंडे, भगवान पदमने, पांडुरंग चोपडे, अरुण गवई अमोल वानखडे, भास्करराव शिरभाते, रमेश वाजगे, अजय भटकर, राम गव्हाळे, मंदा रेवसकर, विशाल सावळे, नितीन इंगळे, संदीप खंडारे, उमेश इंगळे, विजय प्रल्हाद इंगळे,महादेव कळसकर, विश्वनाथ डांगे व बहुसंख्य समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### धरणे आंदोलनात या संघटना झाल्या होत्या सहभागी

» राष्ट्रीय चर्मकार महासंघ, राष्ट्रीय चर्मकार महासंघ महिला आघाडी, ज्येष्ठ नागरिक विचार मंच, भगवान रविदास कम्युनिटीज फेडरेशन, श्री गुरु रविदास प्रतिष्ठान, चर्मकार सेवा समिती, दक्षिण झोन चर्मकार संघ, श्री गुरु रविदास चॅरिटेबल ट्रस्ट, श्री गुरु रविदास चर्मकार महासंघ, श्री गुरु रविदास मंदिर योग ग्रुप तसेच अकोल्यातील विविध चर्मकार संघटनांचा सहभाग होता .

# विठू माऊलीच्या दर्शनासाठी रेल्वे सज्ज!

प्रतिनिधी २१ जुलै

**अकोला** : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विठ्ठल भक्तांचा पंढरपूर प्रवास सुखकर व्हावा, यासाठी रेल्वे प्रशासन सज्ज झाले आहे. २५ जुलै रोजी येणाऱ्या आषाढी एकादशीनिमित्त विदर्भातील वारकऱ्यांच्या सुविधेसाठी अकोल्यावरून ३ विशेष गाड्यांसह १ नियमित गाडी उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा निर्णय खा. अनुप धोत्रे यांच्या पाठपुराव्यामुळे शक्य झाला आहे. कमी दरात सुरक्षित प्रवासाची सोय झाल्याने अकोला, अमरावती, बुलढाणा, हिंगोली तसेच मराठवाडा व पश्चिम विदर्भातील हजारो वारकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. यामध्ये नागपूर-मिरज, नवीन अमरावती-पंढरपूर आणि अकोला-पंढरपूर या विशेष आषाढी रेल्वेसह नियमित धावणारी नागपूर-कोल्हापूर रेल्वेचा समावेश आहे. खासदार अनुप धोत्रे म्हणाले, वारकऱ्यांची आस्था आणि श्रद्धा लक्षात घेऊन रेल्वे मंत्रालयाने विशेष गाड्या उपलब्ध करून दिल्या आहेत. याबद्दल मी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. प्रशासनानेही तातडीने सहकार्य केले आहे. रेल्वे प्रवासाच्या अधिक माहितीसाठी प्रवाशांनी हेल्पलाईन १३९ वर संपर्क साधावा किंवा संकेतस्थळाला भेट द्यावी.

### अकोला जंक्शनवरील गाड्यांचे वेळापत्रक

» १. गाडी क्र. ०११९ / ०११२० नवीन अमरावती – पंढरपूर विशेष - ०१११९: नवीन अमरावतीहून २१ व २४ जुलै रोजी सुटून अकोला येथे दुपारी ४:२० ला येईल व ४:३० ला पंढरपूरकडे रवाना. पंढरपूर पोहोच ९:१० सकाळी. तसेच - ०११२०: पंढरपूरहून २२ व २५ जुलै रोजी सायं. ७:३० ला सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी १०:०७ ला अकोला येथे पोहोचेल. २. गाडी क्र. ०१२०५ / ०१२०६ नागपूर – मिरज विशेष - ०१२०५: नागपूरहून २३ व २४ जुलै रोजी सुटून अकोला येथे दुपारी १:२७ ला येईल व १:३० ला मिरजकडे रवाना. पंढरपूर पोहोच ८:०० सकाळी. तसेच - ०१२०६: मिरजहून २४ व २५ जुलै रोजी सुटून पंढरपूर येथे दुपारी ३:५५ ला येईल व ५:०० ला नागपूरकडे रवाना. अकोला पोहोच दुसऱ्या दिवशी सकाळी ७:१०.

३. गाडी क्र. ०७६३५ / ०७६३६ अकोला – पंढरपूर विशेष - ०७६३५ : अकोल्याहून २४ जुलै रोजी सकाळी ११:०० ला सुटून २५ जुलै आषाढी एकादशीला सकाळी ९:२० ला पंढरपूर येथे पोहोचेल. तसेच - ०७६३६: पंढरपूरहून २५ जुलै रोजी दुपारी ३:५० ला सुटून २६ जुलै रोजी दुपारी ४:५० ला अकोला येथे परतेल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135